## संपादकीय

# भविष्यातील पदवी शिक्षणाचे स्वरूप कसे असावे?

एआय म्हणजेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि एमएल म्हणजे मशीन लर्निंगची तुतारी वाजताच आपला तंत्रशिक्षण विभाग जागा झाला. जिथून ही सूत्रे हलविली जातात त्या दिल्लीतील एआयसीटीई अधिकारी कामाला लागले. या दोन विषयात स्वतंत्र पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याचे सूतोवाच करण्यात आले. आपल्या राज्यातील राजकारणी मंडळीच्या अधिपत्याखालील खासगी शिक्षण संस्था उत्साहाने कामाला लागल्या. कारण नवा कोर्स म्हणजे अधिक प्रवेश संख्या, अधिक तुकड्या, अन् डोनेशनद्वारे करोडोंची कमाई असे पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याचा मूर्खपणा जगात कुठल्याही विद्यापीठात बघायला मिळत नाही. बहुतेक ठिकाणी अजूनही इलेक्ट्रकल, इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर सायन्स अशा मूळ विषयातच पदव्या दिल्या जातात.

असाच चुकीचा व्यापारी निर्णय काही दशकापूर्वी याच एआयसीटीईने घेतला होता. त्यावेळी आयटी बूम होती. वायटूके नावाच्या समस्येने धुमाकूळ घातला होता. देशात, देशाबाहेर अनेक संगणक पदवीधरांची गरज होती. तेव्हा आयटीची स्वतंत्र पदवी सुरू झाली. एमसीएसारखे पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू झाले. मूलभूत इलेक्ट्रॉनिक्सची पदवी होतीच. जोडीने कॉम्पुटर सायन्सचा देखील वेगळा विभाग, स्वतंत्र पदवी झाली. पण आयटी बूमचा फायदा घेत त्यावेळी खासगी संस्थांच्या जागा वाढविण्यासाठी हास्यास्पद प्रयोग झाले ! इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रकल, कॉम्प्युटर, आयटी, कम्युनिकेशन या अनेक शब्दांपैकी एका वेळी वेगवेगळे दोन शब्द वापरून अनेक नावांनी पदव्या निर्माण झाल्या. या हास्यास्पद प्रकारात एआयसीटीईबरोबर त्या त्या राज्यातील तंत्रज्ञान विद्यापीठांनी देखील साथ दिली. प्रवेश संख्या हजारोंनी वाढल्यामुळे खाजगी संस्थांचे, व्यवस्थापनाचे तर उखळ पांढरे झालेच पण इतर परवानग्या देणाऱ्या संस्थांनी देखील वाहत्या पाण्यात हात धुवून घेतले!

त्या काळापासून इंजिनियरिंग शिक्षण क्षेत्रात संख्या विरूध्द गुणवत्ता, असे शीतयुद्ध सुरू झाले. पिठाच्या गिरणीतून पीठ बाहेर पडावे तसे या खासगी इंजिनियरिंग कॉलेजातून आयटी, संगणक इंजिनिअर बाहेर पडू लागले. इतर कोर्सेसच्या तुलनेत यांना कॉल सेंटरसारखे जॉब मिळणे सोपे झाले. अनेकांनी परदेशाची वाट धरली. तिकडे अमेरिकेच्या तुलनेत कमी पगार असला तरी विनिमय दराने गुणले तर रुपयातला पगार लाखात ! याचा दोन्ही पक्षी फायदा झाला. इलेक्ट्रॉनिक्स, आयटी हे विषय नोकरीच्या बाजारात सदैव जादा भाव देणारे हे सत्य नाकारता येत नाही. या मृगजळाचा फायदा सर्वांनीच घेतला. सिव्हिल, मेकॅनिकलची मंडळीदेखील पदवीनंतर संगणक क्षेत्राकडे वळली. आता यात आयटीच्या सोबतीने एआय, एमएल, डेटा सायन्स या विषयाची भर पडली आहे. हे असे सामान्य शिक्षणाकडून स्पेशलायझेशनकडे जाणे भविष्याच्या दृष्टीकोनातून कितपत योग्य आहे हा खरा विचाराचा मुद्दा आहे.

पूर्वी आपली शिक्षण पद्धत त्रिकोणासारखी होती. आधी पायाभूत सर्व विषय शिकायचे. वय वाढते तसे पदवीनंतर विशिष्ट विषयाचे (पदव्युत्तर स्पेशलायझेशन) शिक्षण घ्यायचे. नंतर अधिकाधिक अरुंद गल्लीत प्रवेश करीत सुपर स्पेशालिस्ट व्हायचे. वैद्यकीय शिक्षण याचे उत्तम उदाहरण. आताच्या स्पेशल विषयातल्या पदव्या याच प्रकारात मोडणाऱ्या! असे पदवीधर विद्यार्थी नव्या क्षेत्राचा अवांतर विषयातील समस्यांचा सामना करण्यात अयशस्वी ठरण्याची शक्यता असते. आपण भविष्यातील गरजा, तंत्रज्ञानाचा विस्तार अन् वेग, नवी आव्हाने, समस्यांचे गुंतागुंतीचे स्वरूप, हे सारे लक्षात घेतले तर शिक्षण, अभ्यासक्रम, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे स्वरूप याचा नव्याने विचार करावा लागेल. हा आकार त्रिकोणाऐवजी चौकोनी हवा. म्हणजे विद्यार्थ्याला सर्व विषयाचे थोडे थोडे ज्ञान हवे. एकाच विषयाचे सखोल ज्ञान उपयोगाचे ठरणार नाही.



## आजची चित्रोळी

डाळींबानं झाड भरलं,
हिरव्यागार पानामधीं !
बघुनियां जीव खुळा,
झाला बघा मना मधीं !!
************************
लाल रंगाचं, न्याऱ्या ढंगाचं,
भरल्या दाण्याचं, भरलं फळ !
ग्ऽअ्ऽअ्ऽअ्ऽअ्....
तोडा चटकन, खाऊं पटकन
गीळू गटकन, डाळींबासी !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

## पान १ वरून...

### शांतिगिरी महाराजांनी EVM कक्षाला...

नाशिक लोकसभेच्या जागे सुरुवातीला राष्ट्रवादीचे अजित पवार गटाचे छगन भुजबळ इच्छुक होते. परंतू महायुतीत ही जागा कोणाला सोडायची याचा निर्णय होईना म्हणून भुजबळ यांनी माघार घेतली. त्यानंतर अखेर शिंदे गटाचे विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याच्या वर्षा निवासस्थानी शक्ती प्रदर्शन केले. त्यानंतर अखेर नाशिकचे तिकीट गोडसे यांनी मिळविले. मात्र, त्यांच्या विरोधात ठाकरे गटाने राजाभाऊ वाजे यांना तिकीट दिले आहे. तर बडे प्रस्थ असलेल्या शांतिगिरी महाराज यांनी देखील हट्टाने अपक्ष म्हणून येथून अर्ज भरल्याने शिंदे गटाचे उमेदवार हेमंत गोडसे अडचणीत आल्याचे म्हटले जात आहे. भाजपाच्या कार्यकर्त्यांचा आणि हिंदू मतदारांचा शांतिगिरी महाराजांना आधार मिळाला तर हेमंत गोडसे अडचणीत येणार असल्याचे म्हटले आहे.

### पुण्यातील पोर्शे गाडी अपघात प्रकरणाची...

याबरोबरच या प्रकरणातील आरोपीला कोणती विशेष ट्रिटमेंट दिली असल्यास त्यावेळचे पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही फुटेज तपासून ते खरे असेल तर तात्काळ संबंधित अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करा, अशा सूचना उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या आहेत.

सदर मुलगा हा पुण्यातील प्रतिष्ठित बांधकाम व्यावसायिकाचा मुलगा आहे. तो दारुच्या नशेत कार चालवत होता आणि त्याने दोघांना उडवलं ज्यात त्या दोघांचा मृत्यू झाला. त्याच्या रक्ताचे नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. तसंच त्याला जामीनही मिळाला होता. पुणे शहर पोलिसांनी सांगितलं की, या प्रकरणातला आरोपी अल्पवयीन आहे. त्याच्याविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला. त्याच्याविरोधात मोटार वाहन कायद्यातील ज्या कलमांचं उल्लंघन झालं ती कलमंही लावण्यात आली. या प्रकरणात अल्पवयीन मुलाचे वडील आणि ज्या बारने या मुलाला आणि त्याच्या मित्रांना मद्य दिलं त्यांच्याविरोधात कलम ७५ आणि ७७ अंतर्गत कारवाई केली जाईल. असंही त्यांनी स्पष्ट केलं होतं.

न्यायालयाने दिले निबंध लिहिण्याचे आदेश

न्यायालयाने अल्पवयीन मुलाला जामीन देताना कार अपघातावर निबंध लिहिण्यास सांगितलं आहे. पोर्शेने दुचाकीला टक्कर दिली आणि त्यात दोन जणांचा मृत्यू झाला. पुण्यातल्या या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. आरोपीने १५ दिवस येरवडा विभागात ट्राफिक कॉन्स्टेबलसोबत वाहतुकीचं नियोजन करावं. अपघातावर त्यानं ३०० शब्दाचा निबंध लिहावा आणि मद्य सोडायला मदत होईल, अशा डॉक्टरकडून उपचार घ्यावेत, असं सांगितलं. तसंच मानसोपचार तज्ज्ञांचे समुपदेशन घेऊन त्यासंदर्भात अहवाल न्यायालयात सादर करण्यास सांगितलं आहे, अशी माहिती अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी दिली होती.

### "त्यांना पराभवाची चाहूल लागलीय";...

सर्व नागरिकांनी मतदान प्रक्रियेत सहभाग घेऊन जास्तीत जास्त संख्येने मतदान करावं, असं आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केलं आहे. "महाराष्ट्रातील पाचव्या आणि अखेरच्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया आज पार पडत आहे. माझं महाराष्ट्रातील सर्व नागरिकांना आवाहन आहे की त्यांनी लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी व्हावं. आपलं एक मत इतिहास घडवणारं आहे, राष्ट्र घडवणारं आहे. त्यामुळे सर्वांनी मतदान करावं. देशभरातील नागरिक नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी उत्सुक आहेत. महाराष्ट्रातीलही प्रतिक्रिया तशाच आहेत. त्यामुळे नागरिकांनी ऊन होण्याआधी घराबाहेर पडून मतदान करावं," असं मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटलं आहे.

### मुंबईत आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी...

डोंगरी इमामवाडा येथे साबुसिद्धीकी या रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर धर्माच्या आधारे मतदान करण्याचे आवाहन करणारे पोस्टर सापडले. याप्रकरणी सर जे.जे. पोलिसांनी अब्दुल रज्जाक मणियार याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. याशिवाय प्रचार कालावधी संपला असताना प्रचार करत असताना व्हॉट्सअॅप ग्रुपवर प्रचार करत असताना आढळला. याप्रकरणी डीएन नगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मोहसिन हैदर नावाच्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

### जलसंकटाची चाहूल; मोठ्या, मध्यम...

यंदा उन्हाळ्याची तीव्रता नाही, उलट अवकाळी पाऊस पडतो आहे. मात्र यामुळे वातावरणात उकाडा वाढला आहे. या पर्यावरणीय बदलाचाही फटका बाष्पिभवनाच्या माध्यमातून जलसाठ्यांवर होत आहे. सध्या महापालिकेने पाणी कपात केली नाही, मात्र शहराच्या वेगेवेगळ्या भागात जलवाहिन्या नसल्याने तेथे टॅन्करने पाणी पुरवठा केला जात आहे. पुढच्या काळात उन्हाची तीव्रता वाढली आणि पावसाला विलंब झाला तर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

सध्या शहरात पाणी टंचाई नसली तरी पाण्याचा अपव्यय मोठ्या प्रमाणात सुरू आहे. अनेक ठिकाणी जलवाहिन्या फुटल्या आहेत. काही ठिकाणी अनधिकृतरित्या जोडण्या घेऊन पाणी इतरत्र वळते केले जात आहे.. बाटलीबंद पाण्याची विक्री करणारे असे प्रकार करतात. सर्वाधिक पिण्याच्या पाण्याचा अपव्यय बांधकामाच्या ठिकाणी केला जातो. काही ठिकाणी बांधकामासाठी पिण्याचे पाणी वापरले जात असल्याची माहिती आहे. वाहनेधुणे, घरापुढे अंगणात शिंपण्यासाठी सुद्धा घरच्या नळाचे पाणी वापरले जाते.

### सिंधुदुर्ग जिल्ह्यात भूस्खलन झालेल्या...

यासाठी शासनाकडून जिओलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया या कंपनीची नियुक्ती करण्यात आली होती. या कंपनीने २०१९-२० आणि २०२०-२१ मध्ये सर्व्हे करून भूस्खलन होणारी गावे निश्चित केली आहेत.

या गावांवर जिल्हा प्रशासन आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. जिल्ह्यात २० गावे अशी आहेत की ज्या ठिकाणी भूस्खलन होते. यात ४६८ कुटुंबे आणि १९७७ व्यक्ती बाधित आहेत. या ठिकाणी पावसाळयात भूस्खलन झाल्यास तेथील नागरिकांना रेस्क्यू करणे, त्यांच्या राहण्याची, खाण्याची व्यवस्था नजीकच्या शाळा, समाजमंदिर आदी ठिकाणी करण्यात आली आहे. या गावांवर जिल्हा आणि तालुकास्तरीय आपत्ती व्यवस्थापन विभागाची २४ तास नजर असणार आहे. यावेळी संभाव्य भूस्खलन स्थिती निर्माण झाल्यास त्या ठिकाणी लागणारी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून देण्यात आली.

### अरविंद केजरीवालांच्या अडचणीत वाढ...

त्यामुळे न्यायालय यावर काय निर्णय देत याकडे 'आप'च्या नेत्यांचं लक्ष लागलं आहे.

गेल्या आठवड्यात ईडीने दिल्ली उच्च न्यायालयात मनीष सिसोदिया यांच्या जामिनाच्या सुनावणीदरम्यान सांगितलं की, आम आदमी पार्टीला या मद्य धोरण घोटाळा प्रकरणात सहआरोपी करण्यात येईल. माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांनी दाखल केलेल्या याचिकेला केंद्रीय तपास यंत्रणेने विरोध केला होता. याचवेळी ही माहिती ईडीच्या वकिलांनी सांगितली होती.

# मुंबईत १५० वर्षांपूर्वी धावलेल्या 'ट्राम'ची कथा

कहीं बिल्डिंग, कहीं ट्रामें,
कहीं मोटर, कहीं मिल...
मिलता है यहाँ सबकुछ,
मिलता नहीं दिल...

१९५०च्या दशकातल्या मुंबईचे अचूक वर्णन करणाऱ्या गाण्याच्या या ओळी, 'सीआयडी' सिनेमातल्या. ७४ वर्षांनंतर आजच्या मुंबईचे वर्णन करायचे झाले तर ते 'कहीं टॉवर, कहीं मेट्रो, कहीं मोनो, कहीं मॉल...' असे करावे लागेल. बदलत्या काळाच्या या झपाट्यात मुंबईने अनेक जुन्यापुराण्या खुणा आजही जपल्या आहेत. जसे की छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, महापालिकेची इमारत, क्रॉफर्ड मार्केट, फोर्ट परिसरातल्या ब्रिटिशकालीन इमारती आणि काय काय आणि किती किती. मात्र, अभिमानाने मिरवाव्यात अशा आठवणी काळाच्या ओघात नष्टही झाल्या. अशा अनेक आठवणींपैकी एक म्हणजे मुंबईतली ट्राम सेवा.

मुंबई आणि ट्रामचे नाते

मुंबईत ट्रामची कल्पना पुढे आली १८७१ मध्ये. त्याआधी घोडागाड्यांची चलती होती. आदल्या वर्षी, म्हणजे १८७० मध्ये लंडनमध्ये घोड्याच्या ट्रामगाड्यांना सुरुवात झाली होती. हाच प्रयोग मुंबईतही करून पाहू, म्हणून इंग्रजांनी घोड्याच्या ट्रामगाड्या सुरू करण्याचे ठरवले. त्यानुसार १८७३ मधे बॉम्बे ट्रामवे कंपनीची स्थापना करण्यात आली. ९ मे १८७४ ला मुंबईच्या रस्त्यावर पहिली ट्रामगाडी धावली. सुरुवातीला कुलाबा-क्रॉफर्ड मार्केट-पायधुणी आणि बोरिबंदर-काळबादेवी-पायधुणी या दोन मार्गांवर ट्रामगाडी धावू लागली. घोड्यांनी ओढल्या जाणाऱ्या या ट्रामगाड्यांना त्या काळात लोकांनी खूप विरोध केला. त्यामुळे ट्रामगाड्यांना सुरुवातीच्या काळात अल्प प्रतिसाद मिळाला. मात्र, हळूहळू ट्रामगाड्यांना होणारा विरोध मावळून ट्राम गर्दीने फुलू लागल्या. कुलाबा ते पायधुणी या प्रवासासाठी त्या काळात तीन आणे लागायचे. किफायशीर सेवा म्हणून लोकांनी ट्रामगाड्यांवर शिक्कामोर्तब केले. १८७४ ते १९०५ या कालावधीत ससून डॉक, वाडी बंदर, लालबाग, जेकब सर्कल, कर्नाक बंदर, धोबी तलाव, जे.जे. हॉस्पिटल, ग्रँट रोड या भागांपर्यंत ट्रामचा विस्तार झाला.




विजेवरची ट्राम

१९०५ मध्ये बॉम्बे इलेक्ट्रिक सप्लाय अँड ट्रामवेज कंपनी अर्थात बेस्टची स्थापना झाली. बेस्टने बॉम्बे ट्रामवे कंपनी विकत घेऊन विजेवर चालणाऱ्या ट्रामगाड्या मुंबईत आणल्या. ७ मे १९०७ ला विजेवर चालणारी पहिली ट्राम मुंबईत धावली. पालिका मुख्यालय ते क्रॉफर्ड मार्केट एवढाच या ट्रामचा प्रवास होता. १९२० पासून दुमजली ट्राम मुंबईच्या रस्त्यांवरून धावू लागल्या. ट्रामची धाव दादरपर्यंत गेली. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ते दादर या ट्रामच्या प्रवासासाठी दीड आणे लागायचे त्या काळात. दादरपर्यंत आलेली ट्राम नंतरच्या काळात माटुंग्यापर्यंत धावू लागली. ट्रामगाड्यांना मिळणारा प्रतिसाद पाहून त्या अधिकाधिक रस्त्यांवर धावतील, अशा पद्धतीने महापालिका प्रयत्न करू लागली. तोपर्यंत प्रवासाची साधने वाढू लागली होती. बग्ग्या, बस, लोकल, टॅक्सी, खासगी वाहने यामुळे ट्राम हळूहळू मागे पडू लागली आणि ३१ मार्च १९६४ ला ट्रामने मुंबईचा निरोप घेतला. आताच्या घडीला ट्रामचे भारतातले अस्तित्व फक्त कोलकात्यापुरतेच मर्यादित आहे. मुंबईत ट्राम पुन्हा अवतरली तर तिचे नक्कीच स्वागत करतील मुंबईकर...

# भारतीय माहिती क्रांतीचे जनक राजीव गांधी

आज २१ मे, भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचा आज ३३ वा स्मृतीदिन. राजीव गांधी यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हटले जाते. आधुनिक विचार आणि कठोर निर्णयामुळे राजीव गांधी यांनी जगात भारताची वेगळी ओळख निर्माण केली. २० ऑगस्ट १९४४ रोजी जन्मलेले राजीव गांधी हे भारताचे सर्वात तरुण पंतप्रधान होते. वयाच्या अवघ्या ४० व्या वर्षी राजीव गांधी हे भारताचे पंतप्रधान बनले. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधी यांचे जेष्ठ सुपुत्र असलेले राजीव यांना राजकारणात रस नव्हता. देशातील सर्वात प्रतिष्ठित राजकीय घराण्यात जन्म घेऊनही राजीव गांधी हे राजकारणापासून दूरच होते. राजीव गांधी यांचे शिक्षण डेहराडूनच्या शाळेत झाले त्यानंतर ते हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या डुन च्या निवासी शाळेत दाखल झाले. तिथे त्यांना अनेक मित्र भेटले या मित्रांशी त्यांनी आयुष्यभर मैत्री जपली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते केम्ब्रिजच्या ट्रीनीटी महाविद्यालयात गेले पण लवकरच लंडन स्थित इम्पेरियल महाविद्यालयात प्रवेश घेतला. तिथे त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा अभ्यास केला. त्यांना विज्ञान, तंत्रज्ञान या विषयात खूप रस होता. ते या विषयाची पुस्तके वाचून काढत. विमान उड्डाण करून आकाशात उडावे अशी त्यांची इच्छा होती त्यासाठी त्यांनी वैमानिक होण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडमध्ये त्यांनी फ्लायिंग क्लबची परीक्षा दिली आणि वैमानिक बनले. लगेचच ते इंडियन एअर लाईन्सचे देशांतर्गत सेवेचे वैमानिक बनले. लंडनमध्येच त्यांची आणि सोनिया गांधी यांची मैत्री झाली मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले आणि १९६८ साली त्यांचा विवाह झाला. राजीव गांधी हे अपघातानेच राजकारणात आले. १९८० साली राजीव गांधी यांचे बंधू संजय गांधी यांचा अपघातात मृत्यू झाला. संजय गांधी यांच्या मृत्यूनंतर राजीव गांधी यांनी राजकारणात प्रवेश करावा अशी मागणी कॉंग्रेस मधील नेत्यांकडून होऊ लागली. आई इंदिरा गांधी यांनीही राजीव गांधी यांना राजकारणात उतरण्याची सूचना केली तेंव्हा राजीव यांनी आपल्या भावाच्या संजय गांधी यांच्या अमेठी या मतदारसंघातुन निवडणूक लढवली व मोठ्या मताधिक्याने ती जिंकली. १९८२ साली दिल्लीत भारताने आशियाई क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले. या स्पर्धेच्या नियोजनाची सर्व जबाबदारी राजीव गांधी यांच्याकडे होती त्यांनी ती यशस्वीरीत्या पेलून ही स्पर्धा यशस्वी केली. ३१ नोव्हेंबर १९८४ इंदिरा गांधी यांची हत्या झाली. हत्या झाली तेंव्हा



इंदिरा गांधी या देशाच्या पंतप्रधान होत्या त्यामुळे मोठा घटनात्मक पेच निर्माण झाला. पंतप्रधानपदासारखे देशातील सर्वोच्च पद जास्त दिवस रिक्त ठेवता येणार नाही असे घटना तज्ज्ञांचे मत होते त्यामुळे त्यांनी पंतप्रधान पदाची शपथ घेतली. वैयक्तिक पातळीवर दुःख असूनही त्यांनी पंतप्रधान पदाची जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडली. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत त्यांनी कॉंग्रेस पक्षाला एकतर्फी विजय मिळवून दिला. या निवडणुकीत कॉंग्रेसला ४०० हुन अधिक जागा मिळाल्या. स्वतः राजीव गांधी हे विक्रमी मतांनी जिंकून आले होते. पंतप्रधान असताना त्यांनी देशात अनेक क्रांतिकारक निर्णय घेतले. देशाला महासत्ता व्हायचे असेल तर माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात देशाने प्रगती करायला हवी असे त्यांचे मत होते. २१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे असेल त्यासाठी देशातील प्रत्येक तरुण हा संगणक साक्षर असायला हवा असा त्यांचा आग्रह होता त्यामुळेच त्यांनी देशात संगणक आणला. राजीव गांधी जेंव्हा संगणकावर बोलत होते तेंव्हा अनेकजण त्यांच्यावर टीका करत होते. पण संगणक क्रांती आणणार हा ध्यास त्यांनी घेतला होता. राजीव गांधींमुळेच सर्वसामान्य घरात संगणक पोहचला. राजीव गांधी यांनी घेतलेल्या एका निर्णयामुळे ८ टक्के म्हणजे तेरा लक्ष कोटींचा माहिती तंत्रज्ञान उद्योग उभा राहिला. यातून पन्नास लाख लोकांना थेट रोजगार मिळतो आहे. माहिती प्रधान सभ्यता, ज्ञान प्रधान सभ्यता, बुद्धिमत्ता प्रधान सभ्यता या तीन क्रांतीची पायाभरणी राजीव गांधी यांनी केली. त्याचीच फळे आज भारत देश चाखतो आहे. राजीव गांधी यांच्या दुरदृष्टीमुळे भारताचा वेगाने विकास झाला आणि लोकांचे जीवनमान उंचावले. स्वभावाने गंभीर पण आधुनिक विचाराच्या राजीव गांधी यांनी देशात माहिती तंत्रज्ञान युगाची मुहूर्तमेढ रोवली त्यामुळेच त्यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हणतात. राजीव गांधी यांनी दूरसंचार क्रांती बरोबरच नवे शैक्षणिक धोरण आणून देशभरात नवोदय विद्यालयाची स्थापना केली. त्यासोबतच पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून महिलांना राजकारणात मोठी संधी दिली. राजीवजींनी घेतलेले हे निर्णय भारताच्या जडणघडणीत आणि विकासात मैलाचा दगड ठरले आहेत. भारत देशाला राजीव गांधी यांनी तंत्र वैज्ञानिक दृष्टी दिली. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील महाशक्ती बनवून भारताला स्वाभिमान दिला. पुढच्या पन्नास वर्षांचा अर्थव्यवस्थेचा पाया राजीव गांधी यांनी त्यावेळेला रचला होता त्यामुळेच आपण आज इथपर्यंत पोहचू शकलो. देशाला माहिती तंत्रज्ञानात परिपूर्ण करून महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या पंतप्रधानाचे २१ मे १९९१ रोजी लिट्टे या दहशतवादी संघटनेने मानवी बॉम्बचा वापर करून हत्या केली म्हणून आजचा दिवस देशभर दहशतवादी विरोधी दिवस म्हणूनही पाळण्यात येतो. राजीव गांधी यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# कर्जत तालुक्यात वादळ, पावसामुळे महावितरण यंत्रणेचे अतोनात नुकसान

## वीजपुरवठा पुर्ववत करण्याची कामे युध्दपातळीवर, ग्राहकांकडून सहकार्याचे महावितरणचे आवाहन



● कर्जत - दि.१३ मे २०२४ रोजी वातावरणात कमालीचा बदल झाल्यामुळे रायगड जिल्हा हवामान विभागाकडून खबरदारीच्या सूचना करण्यात आले होते. या दिवशी, कर्जत तालुक्यात अवकाळी पावसाने दमदार, वादळी वाऱ्यासह हजेरी लावल्याने,वीज पुरवठ्याची वाताहात होऊन, तालुक्यात अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला होता. बऱ्याच ठिकाणी उच्चदाब व लघुदाब वाहिनीचे पोल पडले होते, विद्युत रोहित्र निकामी झाले होते. अशा प्रसंगी महावितरण कर्जत तालुक्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम करून खंडित वीज पुरवठा पुर्ववत करण्याचे प्रयत्न करीत होते. सोमवारी झालेल्या पडझडीमुळे विस्कळीत झालेला वीज पुरवठा पुर्ववत करण्यात येत होता व बहुतांशी भागाचा वीजपुरवठा पूर्वपदावर आला असला तरी अजूनही प्रयत्न सुरु असल्याने ग्राहकांनी सहकार्य करावेत असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

दिनांक १३ मे रोजी वादळी वाऱ्यामुळे कर्जत तालुक्यात अनेक ठिकाणी विद्युत यंत्रणा कोलमडून पडली. यासह देखील नुकसान झाले. तर पुन्हा दि. १६ मे २०२४ रोजी संध्याकाळी अचानक अवकाळी पावसाने व घोंगावणाऱ्या वाऱ्याने कर्जत तालुक्यात पुन्हा जोरदार हजेरी लावल्यामुळे महावितरणचा विद्युत पुरवठा विस्कळीत झाला. त्यामध्ये प्रामुख्याने नेरळ इन्कमर उच्चदाब वाहिनीचे ७ पोल, कडाव उच्चदाब वाहिनीचे १७ पोल व अंजप उच्चदाब वाहिनीचे ७ पोल पडल्याच्या घटना संध्याकाळी ७ वाजताच्या सुमारास घडल्या होत्या.

यासह लघुदाब वाहिनीचे अंदाजे ५० पेक्षा अधिक पोल पडले आहेत. या घटनेमुळे कर्जत तालुक्यातील बऱ्याच गावांचा वीजपुरवठा खंडीत झालेला होता. अशा परिस्थितीत वीज ग्राहकांना वीजपुरवठा विना गैरसोय झाली. परंतु नैसर्गिक आपत्तीमुळे क्षतीग्रस्त वीजवाहिन्या, पोल, डीपी , इत्यादी महावितरण तर्फे सदर काम लवकरात लवकर करण्याचा अथक प्रयत्न चालू असून, सदर वीजपुरवठा पुर्ववत करण्याचे कामे युध्दपातळीवर सुरु आहेत. तरी कर्जत तालुक्यातील वीज ग्राहकांनी सहकार्य करावे असे आवाहन महावितरण भांडूप परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी केले आहे. दरम्यान आतापर्यंत अनेक गावातील वीजपुरवठा सुरळीत सुरु झाला असल्याचे समजते.

## थोडक्यात

### ज्वलनशील पदार्थ फेकून तरुणीला लुबाडले

● कल्याण : यूपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणीवर दुचाकीवरील चोरट्यांनी ज्वलनशील पदार्थ फेकून लुबाडल्याची घटना समोर आली आहे. या ज्वलनशील पदार्थाने जखमी झालेल्या मुलीवर उपचार करण्याऐवजी कोळसेवाडी पोलिसांनी तिला एफआयआर दाखल करण्यासाठी धावपळ करण्यास भाग पाडले आहे.

मुलीसोबत घडलेल्या घटनेला रविवारी सायंकाळी ३६ तासांहून अधिक काळ उलटून गेला आहे. मात्र दुचाकीस्वार दरोडेखोरांचा कोणताही सुगावा लागलेला नाही. शनिवारी दुपारी ३.४५ च्या सुमारास लोकग्राम पुलाखालून जे. वॉर्ड समोर, रेल्वे पार्किंगजवळ, दोन दुचाकीस्वार दरोडेखोरांनी २६ वर्षीय तरुणीवर ज्वलनशील पदार्थ फेकला आणि दिवसाढवळ्या लॅपटॉप हिसकावून पळून गेले. ही तरुणी अंधेरी पूर्व येथील नागरदास रोड येथील रहिवासी असून ती यूपीएससी परीक्षेची तयारी करत आहे. घटनेच्या वेळी ती आपल्या नातेवाईकाला लॅपटॉप देण्यासाठी अंधेरीहून कल्याणला आली होती, मात्र लोकग्राम पुलाखालील रेल्वे पार्किंगजवळ ही घटना घडली.

दुचाकीस्वारांचा शोध सुरू

या घटनेला रविवारी सायंकाळी ३६ तासांहून अधिक कालावधी उलटून गेला. मात्र तोपर्यंत दुचाकीस्वार दरोडेखोरांचा सुगावा लागलेला नव्हता. एफआयआरनुसार दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेत पोलिसांनी केवळ लुटमारीचे कलम ३९४ (३४) लागू केले आहे परंतु शरीरावर ज्वलनशील पदार्थ फेकण्याच्या गुन्ह्याचे कलम लावले नसल्याचा आरोप होत आहे. या प्रकरणात, एखाद्या व्यक्तीच्या शरीरावर ज्वलनशील पदार्थ फेकून इजा पोहोचवण्याच्या किंवा शरीराचे विकृतीकरण करण्याच्या हेतूने जर ज्वलनशील पदार्थ टाकला जात असेल तर त्यासाठी वेगळे कलम पोलिसांनी लावायला हवे होते, असे कायदेतज्ज्ञांचे मत आहे. कारण तरुणीच्या अंगावर ज्वलनशील पदार्थ टाकून ही लुबाडणूक करण्यात आली होती.

### कल्याणमध्ये आदिवासी बांधवांचा मतदानावर बहिष्कार!

कल्याण : ठाणे जिल्ह्यातल्या कल्याण तालुक्यातील एका गावातील प्राथमिक गरजाही पूर्ण झालेल्या नसल्यानं इथल्या आदिवासी बांधवांनी मतदानावर बहिष्कार टाकला आहे. त्यामुळं निवडणुकीनिमित्त तरी हे गाव आणि तिथले ग्रामस्थ चर्चेत आले आहेत. कल्याण तालुक्यातील पोई या आदिवासीबहुल गावातील नागरिकांनी मतदानावर बहिष्कार टाकला आहे. पोई हे गाव खरंतर भिवंडी लोकसभा मतदारसंघात येतं. पोई गावातील आदिवासी पाड्याकडं जाणाऱ्या रस्त्याचं काम रखडल्यानं आणि वारंवार याबाबत तक्रार करुनही कामं झालेली नसल्यानं इथल्या नागरिकांनी मतदानावर बहिष्काराचा निर्णय घेतला आहे. आज ठाणे जिल्ह्यातील तिनही लोकसभा मतदारसंघांमध्ये मतदान पार पडत आहे. यामध्ये ठाणे लोकसभा, कल्याण लोकसभा आणि भिवंडी लोकसभा मतदारसंघाचा समावेश होते.

# एक केळ जास्त घेतल्याने विक्रेत्याचा ग्राहकावर हल्ला



● ठाणे : केळी विक्रेत्याकडून केळी खरेदी करताना एक केळ अधिकचे घेतल्याने विक्रेता आणि त्याच्या मुलाने ग्राहकांवर रॉडने हल्ला करून मारहाण केल्याचा गंभीर प्रकार भिवंडीत उघडकीस आला आहे. याप्रकरणी केळी विक्रेता राम गुप्ता (४४) आणि त्याचा मुलगा संजय गुप्ता (१९) यांच्याविरोधात नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी रविवारी त्यांना अटक केली आहे.

भिवंडी येथील कामतघर भागात राहणारा तरूण त्याच्या मित्रासह शनिवारी सायंकाळी नारपोली येथील हनुमान मंदिर परिसरातून पायी जात होते. त्यावेळी केळी विक्रेता राम हा त्याच्या हातगाडीवर तेथे केळी विक्री करत होता. तरूणाने त्याच्याकडून अर्धा डजन केळी विकत घेतली. त्यावेळी तरूणाच्या मित्राने एक केळ जास्त घेतले. त्याचा राग आल्याने राम याने त्याला धक्का दिला. एका केळयाचे पैसे अधिक घे परंतु धक्काबुक्की करू नको असे त्याने रामला खडसावले. त्यानंतर राम याने मोठ्याने शिवीगाळ करण्यास सुरूवात केली.

दरम्यान, राम याचा मुलगा संजय हा त्याठिकाणी आला. त्याने घडलेला प्रकार राम याला विचारला. त्यानंतर संजय याने हातगाडीखाली ठेवलेला लोखंडी रॉड बाहेर काढला. त्यानंतर त्याने दोघांनाही जीवंत सोडणार नाही असे धमकावत तरूणाच्या मित्राच्या डोक्यात रॉड मारला. त्यावेळी तरूण मित्राच्या बचावासाठी गेला असता, त्याच्याही डोक्यात रॉड मारण्यात आला. पुन्हा संजय हा त्या तरूणांना रॉड मारत असताना त्याचा रॉड त्यांनी पकडला. त्यावेळी संजय याने तरूणाच्या हाताला चावा घेतला. या घटनेनंतर तरूणाने राम आणि संजय यांच्याविरोधात नारपोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीनंतर पोलिसांनी संजय आणि राम या दोघांना ताब्यात घेऊन अटक केली आहे.

# वर्षानुवर्षे व्होटिंग करणाऱ्यांचे नावे नसल्याने मतदारांचा संताप

● ठाणे: गेले 20 ते 40 वर्ष न चुकता मतदान करणाऱ्या नौपाडा भागातील नागरिकांचे मतदार यादीतून यंदा नाव नसल्याने त्यांचा संताप झाला आहे. तेथे उपस्थित असलेल्या बीएलओ यांना विचारले असता त्यांनी अर्ज क्रमांक 17 भरण्याचं त्यांना सांगितलं यावेळी त्या अर्जाची मागणी केली असता तो अर्ज आमच्याकडे नाहीत असं त्यांच्याकडून उत्तर देण्यात आलं आता आम्ही काय करायचं असं या नागरिकांनी प्रश्न विचारला आहे.

यापैकी एक नागरिक योगेश प्रसादे असे म्हणाले की मी गेली 30 ते 35 वर्ष सरस्वती शाळेमध्ये मतदान करत आहे गेल्या वर्षी



आमची इमारत पडली असताना सुद्धा त्यावेळेला माझं मतदार यादीत नाव होतं परंतु यंदा यादीमध्ये नाव नाही आता कसे काय मतदान करता येईल याचे मार्गदर्शन देखील आम्हाला मिळत नसल्याचे त्यांनी लोकमतशी बोलताना सांगितले.

कोणत्याही पात्र मतदाराचे मतदारयादीत नाव नसल्यास मतदान करता येणार नाही, असे मा.निवडणूक आयोगाने यापूर्वीच स्पष्ट केले आहे. त्यामुळे मतदारयादीत नाव नसल्यास कोणताही फॉर्म भरून आज मतदान करता येणार नाही.

# आयएएस अधिकारी अभिषेक टालेंच्या 84 वर्षीय वयोवृद्ध आजीनं केलं मतदान

● उल्हासनगर : नुकतीच यूपीएससी परीक्षेत आयएएस अधिकारी पदाचा दर्जा मिळालेले अभिषेक टाले यांची 84 वयोवृद्ध आजी सुमित्रा नामदेवराव टाले यांनी आज मतदानाचा हक्क बजावला आहे. त्यांनी मी मतदान केले असून तुम्हीही मतदान करून लोकशाहीला निवडून देण्याचे आवाहन मतदारांना केले आहे.

अंबरनाथ विधानसभा मतदार संघात उल्हासनगरातील कॅम्प नंबर



5 चा संपूर्ण आणि कॅम्प नंबर 4 चा काही भागाचा समावेश आहे. त्यात कॅम्प नंबर 4 मधील सुभाष टेकडी कानसई रोड परिसरात राहणाऱ्या 84 वर्षीय सुमित्रा टाले यांनी तक्षशिला शाळेवरील मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. त्या आयएएस अधिकारी अभिषेक टाले यांच्या आजी आणि पीआरपी चे माजी नगरसेवक प्रमोद टाले यांच्या मातोश्री आहेत.

# पनवेलमध्ये ३३ अवैध फलकांचे तोडकाम सुरू

● पनवेल : पनवेल महापालिका क्षेत्रात ३३ अवैध फलक मागील अनेक महिन्यांपासून आणि वर्षांपासून उभारले होते. यापूर्वीच्या महापालिका प्रशासनाने याबाबत कोणतीही भूमिका न घेतल्याने अवैध फलकांमुळे महापालिकेचा मोठा महसूल बुडाला आहे. मुंबई येथील फलकाच्या दुर्घटनेतील जीवितहानीनंतर फलकांचे तोडकाम पनवेल महापालिकेने हाती घेतले आहे.

पनवेल महापालिकेमध्ये पालिकेने परवानगी दिलेले आणि पालिकेची परवानगी घेतल्यावर त्या परवानगीची नुतनीकरणाची मुदत संपलेले, स्ट्रक्चरल ऑडीट न केलेले असे ८७ फलक पालिका क्षेत्रात आहेत. या फलकांना पालिका उपायुक्त मारुती गायकवाड यांनी नोटीस बजावून सात दिवसात फलक उभारलेल्या कंपन्या अथवा खासगी व्यक्तींनी पुढील सात




दिवसात फलकाच्या मनोऱ्याचे स्ट्रक्चरल ऑडीट अहवाल व्हीजेटीआयकडून सादर करण्याची सूचना केली आहे. या दरम्यान पालिकेने सर्वेक्षण करुन पालिका क्षेत्रात किती अवैध फलक आहेत याची माहिती घेतली.

पालिकेच्या सर्वेक्षणात ३३ फलक हे विना परवानगी उभारण्यात आले असल्याचे निष्पन्न झाले. फलक लावणारा व्यापारी, पालिकेतील काही अधिकारी, स्थानिक गुंड आणि लोकप्रतिनिधी यांच्या संगनमतातून हा अवैध व्यवसाय सूरु आहे. यापूर्वी सुद्धा पालिकेने अवैध फलकांवर कारवाईचा बडगा उधारला मात्र पालिकेचे वार्ड अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे हे अवैध फलक उभारण्यात आले होते. पालिकेचे आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्या सूचनेनंतर उपायुक्त मारुती गायकवाड यांनी सोमवार ते बुधवारपर्यंत ३३ अवैध फलक तोडण्यासाठी पथक नेमले आहेत. उपायुक्त गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार सर्वाधिक अवैध फलक हे तळोजा परिसरात आहेत.

# कल्याण, डोंबिवलीतून गावी जाणाऱ्या प्रवाशांचे हाल; निवडणूक कामासाठी एस. टी. बस सोडल्याने दोन तास प्रतिक्षा करून बसचा पत्ता नाही

● कल्याण: लोकसभा निवडणूक कामासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बस निवडणूक आयोगाने घेतल्याने या बसच्या माध्यमातून विविध शहरे, आपल्या गावी जाणाऱ्या प्रवाशांचे मागील दोन दिवसांपासून हाल सुरू आहेत. अनेक प्रवाशांनी दोन ते तीन महिने अगोदर एस. टी. बसचे गावी जाण्यासाठी आरक्षण करून ठेवले आहे. अशा प्रवाशांनाही बस वेळेवर उपलब्ध न होण्याचा फटका बसत आहे.

ठाणे, मुंबई पट्ट्यात सोमवारी, २० मे रोजी मतदान होत आहे. या निवडणूक कामासाठी खासगी, शालेय बस बरोबर राज्य परिवहन महामंडळाच्या एस. टी. बसही निवडणूक कर्मचारी, सामान वाहतुकीसाठी घेण्यात आल्या आहेत. कल्याण, विठ्ठलवाडी, ठाणे, भिवंडी, शहापूर, मुरबाड बस आगारांमधील बस या कामांसाठी तैनात करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आगार व्यवस्थापकांना उपलब्ध बसच्या माध्यमातून स्थानिक आणि लांब पल्ल्याच्या बस सोडाव्या लागत आहेत. या बस सोडताना आगार व्यवस्थापकांना मोठी कसरत करावी लागते.

सोमवारी मतदान असल्याने ठाणे जिल्ह्यातील बहुतांशी बस आगारातील बस शनिवारी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या ताब्यात देण्यात आल्या आहेत. त्यामुळे बस आगारांमध्ये आता बसचा तुटवडा जाणवू लागला आहे. ते राष्ट्रीय काम असल्याने त्या बस आम्ही रोखू शकत नाही, असे एका आगार व्यवस्थापकाने सांगितले. आगारीतीलउपलब्ध बसचे योग्य नियोजन करून आम्ही प्रवासी वाहतुकीसाठी बस उपलब्ध करून देत आहोत, असे या व्यवस्थापकाने सांगितले.



### प्रवाशांचे हाल

■ आगारामध्ये आरक्षण तिकीट अगोदर काढुनही बस प्रवासासाठी वेळेत उपलब्ध होत नसल्याने प्रवासी संतप्त आहेत. कल्याण, डोंबिवली, विठ्ठलवाडी भागातील काही प्रवाशांनी स्वारगेट (पुणे) येथे जाण्यासाठी रविवारच्या डोंबिवली-स्वारगेट शिवशाही वातानुकूलित बसमधील आसनाचे आरक्षण अगोदरच करून ठेवले होते. रविवारी सकाळी ९.०७ ला ही बस डोंबिवली एमआयडीसीतील बस आगारात येणे आवश्यक होते. या बससाठी प्रवासी साडे आठ वाजता डोंबिवली बस आगारात उपस्थित होते. परंतु, दोन तास झाले तरी ही बस डोंबिवली आगारात आली नाही. ही वातानुकूलित बस दुरूस्तीचे काम आगारात सुरू असल्याचे कारण प्रवाशांना देण्यात येत होते. त्यामुळे प्रवासी संतप्त झाले होते.

■ बस उशिरा धावत असल्याने या बसने कुटुंबासह प्रवास करणाऱ्या ज्येष्ठ, वृध्द, लहान बाळे यांचे काहिलीने सर्वाधिक हैराण होत होती. प्रवाशांची सतत तगादा लावल्यानंतर अकरा वाजता डोंबिवली-स्वारगेट बस आली. इतर मार्गावर धावणाऱ्या फलटण, गाणगापूर, धुळे भागात जाणाऱ्या बसची हीच अवस्था असल्याचे प्रवाशांनी सांगितले. काही दिवसांपासून गावी जाणाऱ्या बस अनेक ठिकाणी अनियमित वेळेत सोडण्यात येत असल्याने प्रवाशांचा संताप होत आहे.

### स्वारगेट बस बंद

■ डोंबिवलीत उशिरा आलेली कल्याण-स्वारगेट बस पुणे द्रुतगती महामार्गावर पनवेलजवळ गेल्यावर बसच्या इंजिनमधून धूर येऊ लागला म्हणून बंद पडली. या बसमधील एसी बंद पडला. प्रवासी काहिलीने हैराण झाले. अखेर पुण्याकडे जाणाऱ्या बसमध्ये सोयीप्रमाणे प्रवाशांना पाठविण्यात आले.

## तमन्ना भाटियाच्या चित्रपटाचा बॉक्स ऑफिसवर जलवा, १७ दिवसांपासून करतोय तुफान कमाई



बॉक्स ऑफिसवर तमन्ना भाटियाचा तमिळ चित्रपट धुमाकूळ घालत आहे. हा चित्रपट प्रदर्शित होऊन तीन आठवडे झाले आहेत, पण या सिनेमाची क्रेझ अजूनही प्रेक्षकांमध्ये आहे. प्रेक्षक चित्रपट पाहण्यासाठी गर्दी करत असल्याचं पाहायला मिळत आहे. 'अरणमनई ४' असं या चित्रपटाचं नाव आहे. १७ दिवसांपूर्वी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने कमाईच्या बाबतीत यावर्षी प्रदर्शित झालेल्या सर्व तमिळ चित्रपटांना मागे टाकलं आहे.

तमन्ना भाटियाचा चित्रपट 'अरणमनई ४' रिलीज होऊन १७ दिवस झाले आहेत. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर दररोज जबरदस्त कमाई करत आहे. या चित्रपटाने 'कॅप्टन मिलर' आणि 'अयलान' सारख्या सिनेमांना मागे टाकलं आहे. हे दोन्ही या वर्षी प्रदर्शित झालेले सर्वाधिक कमाई करणारे तमिळ चित्रपट आहेत.

दोन आठवड्यात चित्रपटाने किती कमाई केली?

या चित्रपटाने पहिल्या दिवशी ४.६५ कोटींची कमाई केली होती. पहिल्या आठवड्यात एकूण कमाई ३२.१ कोटी रुपये होती. या चित्रपटाने दुसऱ्या आठवड्यात १७.१५ कोटींची कमाई केली होती. आतापर्यंत समोर आलेल्या आकडेवारीनुसार, आतापर्यंत ५३.६७ कोटी रुपयांचे बॉक्स ऑफस कलेक्शन या चित्रपटाने केले आहे.

धनुषच्या कॅप्टन 'मिलर'ला टाकलं मागे

तमन्ना भाटियाच्या या चित्रपटाने वर्षी रिलीज झालेल्या धनुषच्या 'कॅप्टन मिलर'ला मागे टाकलं आहे. इतकंच नाही तर 'अयलान' चित्रपटापेक्षाही 'अरणमनई ४' ने जास्त कमाई केली आहे. 'कॅप्टन मिलर'ने ४९.२२ कोटी रुपये कमावले होते, तर 'अयलान'ची भारतातील कमाई ४९.८१ कोटी रुपये होतं. या दोन तमिळ चित्रपटांना मागे टाकून 'अरणमनई ४' आता पहिल्या क्रमांकावर पोहोचला आहे.

## KKR संघाला दुहेरी फायदा, SRH विरुद्धचा सामना न खेळताही फायनलमध्ये पोहोचू शकतो



आयपीएल २०२४ मधील आता प्लेऑफ्सचे सामने सुरू होणार आहेत. २१ मे रोजी आयपीएल २०२४ चा पहिला क्वालिफायर कोलकाता नाईट रायडर्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात खेळवला जाईल. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियमवर हा सामना खेळवला जाणार आहे. या सामन्यात केकेआरला दुहेरी फायदा होणार आहे. आयपीएलच्या नियमानुसार केकेआर हैदराबादविरुद्ध सामना न खेळताही अंतिम फेरीत पोहोचू शकतो. त्यामुळे केकेआर अंतिम फेरीत पोहोचणार हे जवळपास निश्चित झाले आहे. केकेआरसाठी फायनलमध्ये पोहोचण्याचे समीकरण काय आहे? जाणून घेऊया.

केकेआर पॉइंट टेबलमध्ये अव्वल –

कोलकाता नाईट रायडर्स गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. केकेआर हा आयपीएल इतिहासातील सर्वोत्तम नेट रन रेट असलेला संघ ठरला आहे. या हंगामात खेळल्या गेलेल्या एकूण १४ पैकी ९ सामने जिंकून २० गुणांसह गुणतालिकेत पहिल्या स्थानावर आहे. याशिवाय सनरायझर्स हैदराबाद संघ १४ पैकी ८ सामने जिंकून १७ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. आयपीएलमधील साखळी सामन्यातनंतर आता प्लेऑफ्सच्या सामन्यातही पाऊस खोडा घालण्याची शक्यता आहे. या हंगामात आतापर्यंत ३ सामने पावसामुळे रद्द झाले आहेत. अशा परिस्थितीत पहिला क्वालिफायरही पावसामुळे रद्द झाल्यास काय होईल याचा विचार केला आहे का?

केकेआर थेट फायनलमध्ये कसा पोहोचू शकतो?

पहिला क्वालिफायर सामन्यात पावसाने अडथळा आणला, तर सर्व प्रथम पंच हे सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करतील की सामना कसा तरी किमान ५ षटकांचा खेळवता येईल. मात्र, पाऊस खूपच वेळ सुरु राहिला आणि सामना उशिराने सुरु झाला, तर पंच ५ षटकांऐवजी १ षटकांची सुपर ओव्हर खेळवण्याचा निर्णय घेतील. जर पावसामुळे हेही साध्य नाही आणि सामना रद्द झाला, तर गुणतालिकेत अव्वल स्थानावर असलेला केकेआर संघ सामना न खेळताच अंतिम फेरीत प्रवेश करेल.

केकेआरला दुहेरी फायदा –

कारण राखीव दिवस केवळ अंतिम सामन्यासाठी ठेवण्यात आला आहे. केकेआर आधीच फॉर्मात आहे. केकेआरच्या गोलंदाजांपासून फलंदाजांपर्यंत सर्वजण उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहेत, त्यामुळे केकेआर संघ आधीच ट्रॉफी जिंकण्याचा प्रबळ दावेदार मानला जात होता. आता पाऊस पडला तरी केकेआरला फायदा होणार आहे. यावरून असे दिसते की, केकेआरला दुहेरी फायदा मिळणार आहे.

आयपीएल २०२४ मधील ७० सामन्यांच्या लीग स्टेजनंतर प्लेऑफचे चित्रही स्पष्ट झाले आहे. दोन वेळच्या चॅम्पियन कोलकाता नाईट रायडर्सने लीग टप्पा पहिल्या स्थानावर संपवला, तर सनरायझर्स हैदराबादने दुसरे, राजस्थान रॉयल्स तिसरे आणि रॉयल्स चॅलेंजर्स बंगळुरू चौथ्या स्थानावर राहिले. केकेआर आणि एसआरएच यांच्यातील पहिला क्वालिफायर मंगळवार, २१ मे रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला जाईल, तर आआर आणि आरसीबी यांच्यातील एलिमिनेटर सामना त्याच मैदानावर बुधवारी, २२ मे रोजी खेळवला जाईल. पहिला क्वालिफायर जिंकणारा संघ थेट फायनलमध्ये प्रवेश करेल, तर पराभूत झालेल्या संघाचा सामना दुसऱ्या क्वालिफायरमध्ये एलिमिनेटर सामना जिंकणाऱ्या संघाशी होईल.

आयपीएल २०२४च्या प्लेऑफ वेळापत्रक:

क्वालिफायर-१: केकेआर विरुद्ध एसआरएच, २१ मे, अहमदाबाद

एलिमिनेटर: आरसीबी विरुद्ध आरआर, २२ मे, अहमदाबाद

क्वालिफायर -२: क्वालिफायर १ पराभूत वि एलिमिनेटर विजेता, २४ मे, चेन्नई फायनल – क्वालिफायर १ विजेता विरुद्ध क्वालिफायर २ विजेता ,२६ मे, एमए चिदंबरम स्टेडियम, चेन्नई,

## दीप्तीने जपानमध्ये रचला इतिहास!



### 400 मीटर T20 शर्यतीत जिंकले 'गोल्ड मेडल'

भारताच्या दीप्ती जीवनजीने जपानमधील कोबे येथे झालेल्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये महिलांच्या 400 मीटर T20 शर्यतीत 55.07 सेकंदांच्या विश्वविक्रमासह सुवर्णपदक जिंकले. यासोबतच दीप्ती जीवनजी हिला पॅरिस ऑलिम्पिकनंतर होणाऱ्या पॅरालिम्पिक स्पर्धेचा कोटाही मिळाला आहे. पॅरा वर्ल्ड चॅम्पियनशिपच्या ट्रॅक इव्हेंटमध्ये प्रथमच भारतीय खेळाडूने सुवर्णपदक जिंकले आहे. दीप्ती जीवनजीने अमेरिकेच्या ब्रायना क्लार्कचा विश्वविक्रम मोडला. तिने गेल्या वर्षी पॅरिसमध्ये 55.12 सेकंदांचा वेळ नोंदवला होता. तुर्कीच्या एसील ओंडरने 55.19 सेकंद वेळेसह दुसरे स्थान पटकावले, तर इक्वेडोरच्या लिजनशेला एंगुलोने 56.68 सेकंद वेळेसह तिसरे स्थान पटकावले. यापूर्वी, पॅरा ॲथलेटिक्स वर्ल्ड चॅम्पियनशिप 2024 मध्ये, भारताच्या प्रीती पालने महिलांच्या 200 मीटर T35 प्रकारात कांस्यपदक जिंकले होते. जागतिक पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप 2024 मध्ये भारताने आतापर्यंत एक सुवर्ण, एक रौप्य आणि दोन कांस्यपदके जिंकली आहेत. जागतिक पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपच्या मागील आवृत्तीत, भारताने तीन सुवर्ण, चार रौप्य आणि तीन कांस्यांसह विक्रमी 10 पदके जिंकली होती. जागतिक पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप 25 मे 2024 पर्यंत चालणार आहे.

## रंग माझा वेगळा' फेम अभिनेत्रीच्या 'त्या' कमेंटवर चक्क श्रद्धा कपूरने दिलं उत्तर!



'आशिकी २' चित्रपटापासून शक्ती कपूर यांची लेक श्रद्धा घराघरांत लोकप्रिय झाली. बॉलीवूडमध्ये काही वर्षांतच अभिनेत्रीने आपलं वेगळं स्थान निर्माण केलं. 'तू झुठी मैं मक्कार', 'ओके जानू', 'स्त्री', 'बागी' अशा अनेक चित्रपटांमध्ये तिने भूमिका साकारल्या आहेत. श्रद्धा कपूर सोशल मीडियावर कायम सक्रिय असते. तिच्या फोटोवर तिचे असंख्य चाहते कमेंट्स करत असतात. या सगळ्यांना अभिनेत्री काहीशा मजेशीर अंदाजात उत्तर देत असते.

श्रद्धाने पांढऱ्या रंगाचं टीशर्ट आणि ब्लॅक जॅकेट परिधान करून वेस्टर्न लूकमधले स्टायलिश फोटो नुकतेच इन्स्टाग्राम शेअर केले आहेत. या फोटोंवर तिच्या चाहत्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा पाऊस पाडला आहे. या फोटोला श्रद्धाने "आज क्या नही करना है?" असं कॅप्शन दिलं होतं. यावर केवळ तिच्या चाहत्यांनीच नव्हे तर अनेक कलाकारांनी सुद्धा प्रतिक्रिया दिल्या आहेत.

'रंग माझा वेगळा' फेम अभिनेत्री अनघा अतुलने श्रद्धाच्या पोस्टवर खास कमेंट करत लक्ष वेधलं आहे आणि सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे यावर श्रद्धाने देखील उत्तर दिलं आहे. "बहुत सारा खाना है" अनघाच्या या कमेंटवर उत्तर देत श्रद्धाने "रविवार + बहुत सारा खाना = बेस्ट कॉम्बो" असं म्हटलं आहे.

अनघाने कमेंट्समधील या संभाषणाचा स्क्रीनशॉट तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर करत "always hungry" असं लिहिलं आहे. बॉलीवूडमधल्या स्टार अभिनेत्रीने कमेंटला रिप्लाय दिल्याने अनघाने आनंद व्यक्त केला आहे.

### अनघा अतुलने शेअर केला स्क्रीनशॉट

दरम्यान, श्रद्धा कपूर तिला व्यग्र शेड्यूलमधून वेळ मिळाला की, तिच्या फोटोवर येणाऱ्या असंख्य कमेंट्सला उत्तर देत चाहत्यांचं नेहमीच मन जिंकून घेत असते. आता लवकरच श्रद्धा बहुचर्चित 'स्त्री' चित्रपटाच्या पुढच्या भागात झळकणार आहे. याशिवाय अनघा अतुलच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर 'रंग माझा वेगळा' या मालिकेत तिने श्वेता हे नकारात्मक पात्र साकारलं होतं. या मालिकेमुळे भगरे गुरुजींच्या लेकीला घराघरांत लोकप्रियता मिळाली. तर, यानंतर अनघाने 'पिरतीचा वनवा उरी पेटला' या 'कलर्स मराठी'वरील मालिकेत सुद्धा महत्त्वाची भूमिका साकारली होती.

## T20 WC 2024 पूर्वी संघाने बदलला कर्णधार; ब्रँडन किंग खेळाडूकडे दिली टीमची कमांड



टी-२० वर्ल्ड कपपूर्वी वेस्ट इंडिजला दक्षिण आफ्रिकेसोबत मालिका खेळायची आहे. ज्यासाठी संघाचीही घोषणा करण्यात आली आहे. शाई होप, निकोलस पूरन या मालिकेतून अनेक बड्या खेळाडूंची नावे गायब आहेत. या मालिकेसाठी वेस्ट इंडिजच्या नव्या कर्णधारचीही घोषणा करण्यात आली आहे. मालिकेतील पहिला सामना 20 मे रोजी होणार आहे. या मालिकेसाठी वेस्ट इंडिज संघाची कमान ब्रँडन किंगकडे सोपवण्यात आली आहे. ब्रँडन किंग वेस्ट इंडिज संघाचा 13वा टी-20 कर्णधार ठरला आहे. थालाच्या किल्ल्याला 'या' हंगामात का लागला सुरुंग? जाणून घ्या CSK प्ले-ऑफमध्ये न जाण्याची कारणे

टी-20 वर्ल्ड कपपूर्वी वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिकेसाठी ही मालिका खूप महत्त्वाची आहे. या मालिकेत दोन्ही संघांना आपापल्या तयारीची टेस्ट करण्याची संधी मिळणार आहे. आंद्रे रसेल, निकोलस पूरन, रोव्हमन पॉवेल आणि शिमरॉन हेटमायर हे खेळाडू या मालिकेत खेळू शकणार नाहीत. बहुतेक खेळाडू सध्या आयपीएल 2024 मध्ये खेळत आहेत आणि त्यांचे संघ प्लेऑफमध्ये पोहोचले आहेत. त्यामुळे हे खेळाडू दक्षिण आफ्रिकेसोबतच्या मालिकेला मुकणार आहेत.

मालिका आणि वर्ल्ड कपमध्ये वेगवेगळे कर्णधार

2024 च्या टी-20 वर्ल्ड कप स्पर्धेसाठी वेस्ट इंडिजचा संघ आधीच जाहीर करण्यात आला आहे. ज्यामध्ये संघाची कमान रोव्हमन पॉवेलकडे आहे आणि आता ब्रँडन किंगला टी-20 मालिकेसाठी कर्णधार बनवण्यात आले आहे. पॉवेल सध्या आयपीएलमध्ये राजस्थानकडून खेळत आहे, आणि त्याचा संघ प्लेऑफसाठीही पात्र झाला आहे, त्यामुळे ते वेस्ट इंडिज संघात सहभागी होऊ शकणार नाही.

## दिनविशेष

**घटना**

१९९६: माधवराव पाटील - ब्रिटन मधील इलिंग शहराचे महापौर झाले...

१९९४: सुश्मिता सेन - यांना ४३ व्या जागतिक सौंदर्य स्पर्धेत मिस युनिव्हर्स किताब प्रदान. हा किताब मिळवणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला आहे.

१९९२ : चीन - देशाने १,००० किलो टन क्षमतेच्या अणुबॉम्बची यशस्वी चाचणी केली. हा जगातील सर्वात शक्तिशाली अणुस्फोट आहे.

१९९१: राजीव गांधी - भारताचे पंतप्रधान राजीव गांधी यांची श्रीपेरंबदुर, तमिळ नाडू येथे आत्मघातकी आतंकवाद्यांनी हत्या केली.

**जन्म**

१९७०: रमेश लटके - भारतीय राजकारणी, महाराष्ट्राचे आमदार (निधन: ११ मे २०२२)

१९६० : मोहनलाल दक्षिण भारतीय अभिनेते

१९५८ : नइम खान - भारतीय-अमेरिकन फॅशन डिझायनर

१९३१ : शरद जोशी - हिंदी कवी, लेखक व उपहासकार (निधन: ५ सप्टेंबर १९९१)

१९२८: ज्ञानेश्वर नाडकर्णी - कला समीक्षक व लेखक (निधन: २३ डिसेंबर २०१०)

१९२३ : अर्मांड बोरेल - स्विस गणितज्ञ ( निधन : ११ ऑगस्ट २००३)

१९२२: गोकुलानंद महापात्रा - भारतीय लेखक आणि शैक्षणिक (निधन: १० जुलै २०१३)

**निधन**

२०२२ : तोता सिंग - भारतीय राजकारणी, पंजाबचे आमदार (जन्म: २ मार्च १९१४)

२०००: मार्क आर. ह्यूजेस - हर्बालाइफ कंपनीचे स्थापक (जन्म: १ जानेवारी १९५६)

१९९८: आबासाहेब बाबूराव किल्लेदार - इंटकचे सोलापुरातील नेते

१९९१ : राजीव गांधी - भारताचे ६वे पंतप्रधान (जन्म: २० ऑगस्ट १९४४)

१९७९: जानकीदेवी बजाज भारतीय स्वातंत्र्य वीरांगना (जन्म: ७ जानेवारी १८९३)

१६८६: ऑटो व्हॉन गॉरिक - जर्मन पदार्थवैज्ञानिक (जन्म: ३० नोव्हेंबर १६०२)

१४७१ : हेन्री (सहावा) - इंग्लंडचा राजा (जन्म: ६ डिसेंबर १४२१)

## एमएस धोनी IPL मधून निवृत्ती घेणार की नाही?

### चेन्नई सुपर किंग्जच्या सीईओने केला मोठा खुलासा

चेन्नई सुपर किंग्जचा दिग्गज खेळाडू एमएस धोनी आयपीएलमधून निवृत्त होणार की नाही हा मोठा प्रश्न कायम आहे. आयपीएल २०२४ संपल्यानंतर माहीचा आयपीएल प्रवासही संपेल आणि तो निवृत्त होईल, अशी अपेक्षा होती. अनेक दिग्गज खेळाडूही माही निवृत्त होणार असल्याची अटकळ बांधत होते. आता चेन्नई प्लेऑफमधून बाहेर पडल्याने चाहते धोनीच्या अपडेटची वाट पाहत आहेत की तो आयपीएल २०२५ मध्ये खेळताना दिसणार आहे की नाही. या एपिसोडमध्ये चेन्नई सुपर किंग्जच्या सीईओने धोनीबद्दल मोठी अपडेट दिली आहे. चेन्नई सुपर किंग्जचे सीईओ कासी विश्वनाथन यांनी धोनीबाबत माहिती दिली आहे.

## ऐश्वर्या राय बच्चनच्या हाताला नेमकं झालंय तरी काय?

### लवकरच तिच्या हातावर शस्त्रक्रिया होणार आहे



बॉलीवूड अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चनने नुकतीच ७७ व्या 'कान फिल्म फेस्टिव्हल'मध्ये हजेरी लावली. तिचे कानमधील दोन लूक खूप चर्चेत आहेत. तिचे लूक पाहून चाहते खूप कौतुक करत आहेत. या फिल्म फेस्टिव्हलमध्ये चाहत्यांना ऐश्वर्याच्या हाताच्या दुखापतीची काळजी वाटत होती. या फिल्म फेस्टिव्हलमधून ऐश्वर्या राय आता भारतात परतली आहे. एअरपोर्टवर ऐश्वर्याला पाहून पापाराझींनी तिच्या हाताला फ्रॅक्चर कसे झाले असा प्रश्न विचारला. आता लवकरच तिच्या हातावर शस्त्रक्रिया केली जाणार आहे, अशी माहिती समोर येत आहे.

'हिंदुस्तान टाइम्स'ने अभिनेत्रीच्या जवळच्या सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या माहितीनुसार, "एक आठवड्यापूर्वी ऐश्वर्याच्या हाताला दुखापत झाली होती. पण फ्रॅक्चर असूनही तिने 'कान फिल्म फेस्टिव्हल' जाणं रद्द केलं नाही. तिला तिची 'कान फिल्म फेस्टिव्हल'ला जाण्याची परंपरा पुढे चालू ठेवायची होती. त्यामुळे दुखापतीनंतरही तिने आपल्या प्रोफेशनल कमिटमेंट्स पूर्ण करत कार्यक्रमाला हजेरी लावली."

## राशि भविष्य

**मेष** – भरपूर प्रवासामुळे तुम्ही उन्मादी बनाल. लोकांना नेमके काय हवेय हे समजावून घ्या आणि तुमच्याकडून काय हवे आहे तेही समजून घ्या - परंतु आज खर्च करताना उधळपट्टी करू नका. मुलांच्या बक्षिस समारंभाचे आमंत्रण हा तुमच्यासाठी आनंदाचा मार्ग ठरु शकतो.

**वृषभ** – तुमचे आरोग्य सुधारण्यासाठी प्रयत्न करण्यास लाभदायक दिवस. जर तुम्ही यात्रेवर जाणार असाल तर आपले किमती वस्तूंची काळजी घ्या कारण, चोरी होण्याची शक्यता आहे. खासकरून आपली पर्स व्यवस्थित सांभाळा. शाळकरी प्रकल्पासंबंधी धाकटे तुमच्याकडे सल्ला मागतील.

**मिथुन** – आपला मूड बदलण्यासाठी एखाद्या सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी व्हा. दीर्घकालीन फायद्यासाठी शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडातील गुंतवणूक फायदेशीर ठरेल. तुमच्या अतिखर्चिक जीवनशैलीमुळे तुम्हाला घरात तणावाचा सामना करावा लागेल. त्यामुळे रात्री उशिरापर्यंत बाहेर राहणे टाळा आणि इतरांवर खर्च करणे टाळा.

**कर्क** – आपल्या आकांक्षा आणि महत्वाकांक्षाना धक्का लागण्याची शक्यता आपल्या पत्रिकेत मोठ्या प्रमाणात दिसून येते. ही परिस्थिती हाताळण्यासाठी योग्य सल्ल्याची आपणास गरज आहे. आपल्या धनाचा संचय कसा करावा याचे कौशल्य आज तुम्ही शिकू शकतात आणि याच कौशल्याला शिकून तुम्ही आपले धन वाचवू शकतात.

**सिंह** – तुमच्यात आज उत्तम स्पुर्ती पहिली जाईल. तुमचे स्वास्थ्य आज पूर्णतः तुमची साथ देतील. जवळच्या नातेवाईकाकडे जाणे आज तुमच्या आर्थिक स्थितीला बिघडवू शकते. तुम्ही जर अधिक उदारपणे वागत असाल तर तुमच्या जवळच्या व्यक्ती तुमचा गैरफायदा घेण्याची शक्यता आहे.

**कन्या** – गरोदर स्त्रियांनी जमिनीवर चालताना विशेष काळजी घेण्याची गरज आहे. घरातील गरजेचे सामान खरेदी केल्याने तुम्हाला आर्थिक चिंता नक्कीच होईल परंतु, यामुळे तुम्ही भविष्यातील बऱ्याच समस्यांनी सुटाल. मुलांच्याबाबतीत सहनशीलता बाळगा किंवा तुमच्या पेक्षा कमी अनुभवी व्यक्तींबाबत धीर धरा.

**तूळ** – आज तुम्ही करमणुकीत रमाल. क्रीडा प्रकार आणि मैदानावरील स्पर्धेमध्ये सहभागी व्हाल. पैसे मिळविण्याचा नव्या संधी लाभदायक असतील. आपल्या पालकांचे आरोग्य हा दखल घेण्याचा आणि चिंतेचा विषय असेल. स्वप्नील चिंता सोडून द्या आणि आपल्या रोमॅण्टीक जोडीदाराच्या सहवासाचा आनंद घ्या.

**वृश्चिक** – रक्तदाबाचे रुग्ण त्यांचा रक्तदाब कमी करण्यासाठी आणि कोलेस्टेरॉल नियंत्रणात ठेवण्यासाठी रेड वाईनची मदत घेऊ शकतात. त्यातून त्यांना आराम लाभेल. चढउतारांमुळे फायदा होईल. सतत हसतमुख अशा आपल्या स्वभावामुळे आणि आनंदी, उत्साही, प्रेमळ अशा मूड मुळे आपल्या सभोवतालच्या सर्वांना आनंद आणि सुख लाभेल.

**धनु** – शारीरक व्याधीपासून मुक्तता होण्याची शक्यता आहे. अतिखर्च, उधळेपणा आणि शंकास्पद आर्थिक योजनांमध्ये गुंतणे टाळा. मित्रमैत्रिणींबरोबरची सायंकाळ सुखकारक आणि प्रसन्न असेल. सुट्टीची योजनादेखील तयार कराल. आपले रोमॅण्टीक विचार जगजाहीर होऊ देऊ नका.

**मकर** – सकारात्मकपणे विचार करण्याची सवय लावा. अन्यथा भीतीच्या काळजीच्या भयंकर अशा राक्षसाशी सुरू असणाऱ्या आपल्या लढ्यामध्ये आपण त्या दुष्ट प्रवृत्तीचे निष्क्रिय आणि निदर्यी बळी होऊ शकता. आज तुम्हाला चांगल्यापैकी पैसा मिळणार आहे - परंतु खर्चात वाढ झाल्याने बचत करणे दुरापास्त ठरेल.

**कुंभ** – शक्य असेल तर लांबचा प्रवास टाळणे चांगले. अशा प्रवासासाठी तुम्ही कमकुवत आहात, त्यामुळे हा प्रवास तुम्हाला आणखीनच कमकुवत बनवेल. तुमचे धन कुठे खर्च होत आहे यावर तुम्हाला नजर ठेवण्याची आवश्यकता आहे अथवा येणाऱ्या काळात तुम्हाला समस्यांचा सामना करावा लागू शकतो.

**मीन** – आज तुम्ही निवांत राहण्याची गरज आहे आणि त्यासाठी जवळचे मित्र व कुटुंबातील सदस्य यांच्यासोबत आनंद लुटा. आजचा दिवस जगण्याचा या भावनेने मनोरंजनावर पैसा आणि वेळ खर्च करण्यावर नियंत्रण ठेवा. तुमची अतिरिक्त ऊर्जा आणि प्रचंड उत्साह तुम्हाला सुयोग्य ठरतील असे निर्णय मिळतील आणि घरगुती तणाव सुकर करील.

# गरिबांच्या घराच्या रक्षणासाठी प्लास्टिक कागद आच्छादनाची लगबग....






● सातारा : पावसाच्या आगमनाला काही दिवस बाकी असतानाच सातारा जिल्ह्यातील अनेक खेड्यापाड्यात व शहरा नजीक गरिबांनी आपापल्या झोपडी वजा घर व शिवारातील शेती पिकांवर मिळेल ते प्लास्टिक अच्छादन करण्याच्या कामाला सुरुवात केलेली आहे. या लगबगीमुळे सध्या प्लास्टिक कागदाचा भाव चांगलाच वधारला आहे. नैकृत्य मोसमी पाऊस अंदमान परिसरात दाखल झाल्याची माहिती हवामान खात्याने दिल्यानंतर गोरगरीब व कष्टकरी शेतमजूर यांनी आपापली झोपडी वजा घरे व त्यावरील पत्रा गळती थांबवण्यासाठी आता प्लास्टिकच्या कागद व ताडपत्रीचा वापर सुरू केलेला आहे. सध्या पिवळा, निळा, काळा, सफेद अशा विविध रंगाच्या प्लास्टिकच्या कागदासोबतच सुतळी दोरी, नायलॉनच्या कागद व सुतळी त्याचबरोबर काही ठिकाणी रिबिट लावून अच्छादन टाकले जात आहे. सरासरी प्लास्टिकची कागदाची किंमत ही दिवसेंदिवस वाढत आहे. काही ठिकाणी वॉटरप्रूफिंग केले तरीसुद्धा प्लास्टिकचा कागद अच्छादन केल्याने स्लॅप वर सुरक्षितता येते. त्यामुळे अनेक जण प्लास्टिकचा वापर करतात. सर्वसामान्य कष्टकऱ्यांना प्लास्टिकचे छत म्हणजेच निवारा वाटत आहे.

पावसाळ्याचे आगमन होत असल्याने शेतकरी वर्गाचे कडबा गजी तसेच उत्पादन केलेले धान्य व व्यापाऱ्यांच्या अनेक साहित्याची पावसापासून बचाव करण्यासाठी प्लास्टिकच्या कागदाला मागणी होत आहे. त्यामुळे बाजारपेठेत या प्लॅस्टिकच्या कागदासोबतच ताडपत्रीलाही महत्त्व आलेले आहे. मोठमोठे ट्रक व इतर वाहने यांच्यासाठी जाड व मजबूत अशी ताडपत्री टाकली जात आहे. त्याचबरोबर चार चाकी व दुचाकी वाहनांच्या संरक्षणासाठी सुद्धा प्लास्टिकच्या कागदाचा वापर केला जातो .

पावसापासून बचाव करण्यासाठी प्लास्टिक व रबरी रेनकोट, टोपी व इतर साहित्य साठी सुद्धा बाजारपेठेमध्ये खरेदी करण्यासाठी ग्राहकांची लगबग सुरू झालेली आहे. सातारा जिल्ह्यातील अनेक ठिकाणी विशिष्ट अशा प्लास्टिकचा वापर केला जात असल्याने व्यापारी वर्गाने मोठ्या प्रमाणात प्लास्टिकच्या साठा करून ठेवलेला आहे. यामध्ये अनेकदा किमतींपेक्षा जास्त किंमत प्लास्टिकला आल्याने गोरगरीब व कष्टकरी, शेतमजूर व बेगर लोक हे रिकाम्या पोत्यापासून तयार केलेले कापड हे चांगल्या पद्धतीने शिवून त्याचा पुनर्वापर करत आहेत. त्यामुळे पावसाळ्यात चिंता मिटून गेलेली आहे. सध्या अनेक सामाजिक कार्यकर्ते व नेते आपला वाढदिवसानिमित्त अनेक ठिकाणी फटाक्याची आतिषबाजी व रंगीत पार्टी करतात. जाहिरात बजी करतात त्यापेक्षा त्यांनी अशा गोरगरिबांना पावसाळ्यातून बचाव करण्यासाठी प्लास्टिक कागद मोफत भेट द्यावी. गरिबांच्या संसाराला हातभार लागेल. असे काहींनी सूचना केलेली आहे. त्याची अंमलबजावणी झाली तर खऱ्या अर्थाने आपण सामाजिक कार्य करत आहोत. याचे मनसे आनंद वाटेल असे उघड्यावर संसार असणाऱ्या मंडळींनी विनंती केली आहे.

# कुतूहल...'या' दिवशी सूर्य-चंद्राच्या मध्ये येणार पृथ्वी, जाणून घ्या सविस्तर



● अकोला : जिल्ह्यात २२ मे ते २५ मे या चार दिवसांत शून्य सावली दिवस अनुभवता येणार आहे. २३ मे रोजी सूर्य व चंद्र बरोबर विरूद्ध दिशेने राहणार असून मधात पृथ्वी येणार असल्याची माहिती खगोल निरीक्षक प्रभाकर दोड यांनी दिली. सूर्याचा उत्तरायण आणि दक्षिणायन असा भासमान मार्ग पृथ्वीच्या २३.५०° दक्षिण आणि उत्तरेकडे असतो. कर्कवृत्त आणि मकरवृत्त या दरम्यान असणाऱ्या सर्व भूभागावर सूर्य वर्षातून दोनदा दुपारी डोक्यावर येतो आणि दोनदा शुन्य सावली दिवस येतात. उत्तरायण आणि दक्षिणायन होताना ही स्थिती राहते. सूर्य दररोज ०.५०° सरकतो. सूर्य क्रांती पृथ्वीवरील स्थळाशी समान कोन करते, तेव्हा सूर्य माध्यान्हाचे वेळी नेमका डोक्यावर आल्याने आपली सावली काही क्षणासाठी नाहिशी होते. उन्हाळ्यातील त्या शून्य सावली दिवसाला अधिक महत्त्व आहे, असे खगोल निरीक्षक प्रभाकर दोड यांनी सांगितले.

अकोला जिल्ह्यात २२ मे रोजी शून्य सावली दिवसाला सुरुवात होईल. पातूर, वाडेगाव, धाबा, महान, पिंजर या दक्षिण परिसरातून २२ रोजी शून्य सावली दिवस अनुभवता येईल. २३ मे रोजी अकोला, मूर्तिजापूर, बाळापूर भागात दुपारी १२ वाजून १८ मि. ३० से. ला सावली नाहिशी होईल. २४ मे रोजी पूर्णा नदीच्या उत्तर भागात दहिहांडा, केळीवेळी, चोहोट्टा, अंदूरा या परिसरात सावली काही क्षणांसाठी नाहिशी होईल. २५ मे रोजी अकोट, सावरा, अडगाव, हिवरखेड या भागात शून्य सावली दिवसाचा आनंद घेता येणार आहे, असे दोड म्हणाले.

अकोला जिल्ह्यात अनेकवेळा तापमानाचे नवनवे विक्रम रचले जातात. देशातील सर्वोच्च तापमानाची नोंद सुद्धा जिल्ह्यात झाली आहे. अकोला शहर कर्कवृत्तावर असल्याचे समजले जाते. मात्र, अकोला शहर कर्कवृत्तापासून सुमारे ३०० कि.मी दूर अंतरावर आहे.

### मराठी महिन्यांची देखील अनुभूती

मराठी महिन्यांची नावे प्रत्येक पौर्णिमेला चंद्र ज्या नक्षत्रात असेल त्यावरून ठेवली आहेत, याची अनुभूती घेता येईल. या वैशाख पौर्णिमेला चंद्र विशाखा नक्षत्रात पाहता येईल. पुढील ज्येष्ठ महिन्यात ज्येष्ठा नक्षत्राजवळ असेल, असे दोड म्हणाले.

## बारावीच्या निकालाची तारीख राज्य मंडळाकडून जाहीर




● नवी दिल्ली - केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) आणि कौन्सिल फॉर द इंडियन स्कूल सर्टिफिकेट (सीआयएससीई)एक्झामिनेशनने (सीआयसीएसई) या शिक्षण मंडळांच्या बारावीच्या परीक्षांचे निकाल नुकतेच जाहीर झाले. त्यामुळे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल कधी लागणार याची उत्सुकता निर्माण झाली आहे. राज्य मंडळाने दिलेल्या माहितीनुसार बारावीच्या परीक्षेचा निकाल उद्या (२१ मे) जाहीर करण्यात येणार आहे.

यंदा बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते २३ मार्चदरम्यान घेण्यात आली. यंदा राज्यातील १५.१३ लाख विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यात विज्ञान शाखेसाठी सर्वाधिक सात लाख ६० हजार ४६ विद्यार्थी, कला शाखेसाठी तीन लाख ८१ हजार ९८२, वाणिज्य शाखेसाठी तीन लाख २९ हजार ९०५, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी ३७ हजार २२६, आयटीआयसाठी चार हजार ७५० विद्यार्थ्यांचा समावेश आहे. सीबीएसई आणि आयसीएसईच्या बारावीचा निकाल यंदा वाढला आहे. त्यामुळे राज्य मंडळाचा निकाल वाढणार की कमी होणार याबाबत उत्सुकता आहे. गेल्यावर्षी राज्याचा बारावीचा निकाल ९१.२५ टक्के लागला होता.

# तहानेने वन्यप्राणी व्याकूळ, आचारसंहितेमुळे रखडले चंद्रकोरी तळे



● वर्धा : उन्हाची काहिली वाढत असून अद्याप कथित नवतपा येणे बाकीच आहे. अशा स्थितीत मनुष्यप्रणी हवालदिल झाल्याची स्थिती असतानाच अरण्य प्रदेशात प्राण्यांची स्थिती अधिकच बिकट झाली असल्याचे चित्र आहे. म्हणून कृत्रिम व नैसर्गिक पाणवठे तहान भागविण्यासाठी वन विभागाने तयार केलेत. पण आता त्यापुढील टप्पा म्हणून चंद्रकोरी तलाव स्थापन करण्याचे ठरले आहे. आर्वी व कारंजा तालुक्यातील चार वन क्षेत्रात हे तळे तयार होणार. एका तळयासाठी २० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. किमान दोन हेक्टर आकारमान असलेल्या तळयाच्या निर्मितीसाठी प्रस्ताव पाठविण्यात आले असल्याचे वन अधिकारी जाधव यांनी सांगितले.

या क्षेत्रात २५ ते ५० हेक्टर परिसरात पाण्याचा स्रोत तयार होणार. धमकुंड परिसरात दोन तर खैरवडा भागात दोन चंद्रकोरी तळे निर्माण करण्याचा उद्देश असल्याचे खात्याने स्पष्ट केले. हे तळे तयार झाल्यानंतर वन्यप्राण्यांची भटकंती थांबणार असल्याचा दावा वन खाते करीत आहे. पण हे काम सध्या खोळंबले आहे. कारण आचारसंहिता असल्याने प्रस्ताव स्थगित असल्याचे अधिकारी सांगतात. या चंद्रकोरी तळयाची प्रतिकृतीही अद्याप तयार झालेली नाही. पण प्रस्ताव दिला असल्याचे खात्याकडून कळले.

बोर व लगत क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बिबट तसेच वाघ व अन्य हिंस्र पशुंचा वावर आहे. आता तप्त उन्ह असल्याने हे प्राणी लागतच्या खेडूयात धाव घेऊ लागतात. मनुष्य व वन्यप्राणी यातील संघर्ष थांबला पाहिजे म्हणून हा चंद्रकोरी तळे प्रस्ताव एक पथदर्शी उपक्रम म्हणून पुरुस्कृत झाला आहे. विस्तीर्ण परिसरातील हे तळे तहान भागविणार आणि जमिनीत पाणी पण झिरपणार, असे म्हटल्या जाते.

## ऐन मतदानाच्या दिवशी मध्य रेल्वेची वाहतूक रविवारच्या वेळापत्रकाने



● ठाणे: लोकसभा निवडणुकीचे मतदान असल्याने मतदार मतदानासाठी बाहेर उतरला असतानाच मध्य रेल्वेने मतदानाच्या दिवशी रेल्वेची वाहतूक सुट्टीच्या वेळापत्रकाने सुरू केली आहे. पूर्वी मुंबईत राहणारे अनेक रहिवासी ठाणे किंवा त्यापल्याड राहण्यास गेले आहेत. परंतु त्यांचे मतदान मुंबई तसेच उपनगरात असते. परंतु मध्य रेल्वेचे वेळापत्रक रविवारच्या दिवसाचे असल्याने या मतदारांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदान आजपासून सुरू झाले आहे. मतदानाच्या दिवशी नागरिकांना मतदान करता यावे यासाठी सुट्टी जाहीर करण्यात आले आहे. असे असले तरीही काही अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना कामानिमित्त बाहेर पडावे लागत असते. तसेच गेल्या काही वर्षांपासून मुंबई तसेच उपनगरात राहणारा मतदार पुनर्विकास तसेच राहण्यास स्वस्त पर्याय म्हणून ठाणेपल्याड राहण्यासाठी गेला आहे. यातील अनेकांचे मतदान हे त्यांच्या पूर्वीच्या वास्तव्याच्या ठिकाणी आहे. त्यामुळे हे मतदार देखील मतदानाच्या दिवशी बाहेर पडू लागले आहेत.

# मुलांनी खेळायचे कुठे?


### शहरात दीडशे शाळा मैदानाविना, नियमांकडे डोळेझाक करून प्रशासनाचा मान्यतेचा 'खेळ'



● छत्रपती संभाजीनगर - विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण व खेळाविषयी आवड निर्माण व्हावी, यासाठी शाळांना मैदाने असणे आवश्यक आहे. तसा नियमही आहे. तथापि, छत्रपती संभाजीनगर शहरातील १५० शाळांना स्वत:ची मैदानेच नसल्याचे 'यू-डायस प्लस'च्या अहवालातून समोर आले आहे.

जिल्ह्यात शासकीय, निमशासकीय, अनुदानित, विनाअनुदानित प्राथमिक व उच्च प्राथमिकच्या एकूण ४ हजार ४९० शाळा आहेत. शासकीय २ हजार २४२, तर अनुदानित, विनाअनुदानित २ हजार २४८ शाळा आहेत. त्यामध्ये १२२ शासकीय शाळांना स्वतःचे मैदानच नाही, तर अनुदानित, विनाअनुदातनित १५४ शाळांनाही स्वतःचे मैदान नाही. शाळेच्या मान्यतेसाठी मैदानासह इतर अकरा निकषांची पूर्तता करावी लागते. परंतु, प्रशासनाने याकडे डोळेझाक करीत मैदाने नसलेल्या अनेक शाळांना मान्यता दिली आहे. शाळा मान्यतेसाठी मैदानाची अट असताना या शाळा कुणाच्या आशीर्वादाने सुरू आहेत, असा प्रश्न उपस्थित होत आहे. शाळांच्या वेळापत्रकात आठवड्यात दोन ते चार तास खेळाचे असतात, पण मैदानच नसल्याने खेळायचे कुठे, असा प्रश्न मुलांना पडतो. काही शाळा दुसऱ्या मैदानांवर मुलांना घेऊन जातात.

## 3 people rescued after wall of old 'wada' in Pune's Ganesh Peth collapses



● Pune - The Pune Fire Brigade rescued three people after the wall of an old wada in Ganesh Peth where they were residing collapsed in the early hours of Monday.

The fire brigade identified the three people as Shila Rajkumar Chorghe,40, Srushti Rajkumar Chorghe, 12, and Pramod Kedari, 41. The fire brigade's control room received a call about the wall collapse around 1.40 am. Soon a team of firemen rushed to the spot. "We got a call that the wall of an old wada at 370, Ganesh Peth, collapsed over a vehicle. But when we reached the spot along with the Pune city police, it was found that a family inside the wada was stuck as the wall that collapsed had closed the entrance of their house," said a fireman named Sunil Name.

# 20,000 litres of liquor seized in Gurgaon since Model Code of Conduct came into effect



● Gurugram - The Gurgaon administration in Haryana has seized 20.104 litres of illegal liquor worth Rs 61.16 lakh since the Lok Sabha elections 2024 Model Code of Conduct (MCC) came into effect on March 16, said officials.

As of May 16, the police department had seized 17,174 litres of illegal liquor worth Rs 53 lakh and filed 370 FIRs. Meanwhile, the enforcement team seized 2,930 litres of illegal liquor worth about Rs 7.7 lakh and filed 11 FIRs against those found violating the poll code.

Deputy Commissioner and District Election Officer Nishant Kumar Yadav said five flying squad teams are working in each Assembly area to ensure that the election process remains legal.

Voting in the district will be held on May 25 during the sixth phase of Lok Sabha elections 2024. Union minister and sitting MP Rao Inderjit Singh of the BJP is up against Raj Babbar of the Congress in Gurgaon, one of the 10 Lok Sabha seats in Haryana.

# खोदकामात २०० वर्ष जुनी इमारत आढळली;



● अकोला : शहराचे आराध्य दैवत श्री राजराजेश्वर मंदिरातील विकास कार्यासाठी सुरू असलेल्या खोदकामात शनिवारी २०० वर्ष जुनी इमारत आढळली. भुयारी मार्गासारखी दिसणारी ही इमारत पाहण्यासाठी भाविकांची गर्दी उसळली आहे. पुरातन श्री. राजराजेश्वर मंदिराचा विकास करण्याच्या दृष्टीने प्रशासनाने आराखडा तयार केला. मंदिराच्या विकासासाठी राज्य शासनाने मोठ्या प्रमाणात निधी देखील उपलब्ध करून दिला.

श्री राजराजेश्वर मंदिराच्या विकास कामाला प्रारंभ करण्यात आला आहे. मंदिराच्या आजूबाजूचे विकास काम सुरू आहे. मंदिराच्या मागे लागूनच असलेल्या शिकस्त झालेल्या जुन्या इमारतीला पडण्याचे काम गेल्या काही दिवसांपासून करण्यात येत आहे. मंदिराच्या विकास कार्याला व्यापक स्वरूप देण्यासाठी खोदकाम केले जात आहे. हे खोदकाम चालू असताना जमिनीखाली भुयारी मार्गासारखी इमारत आढळून आली. ही इमारत २०० वर्षापेक्षा जास्त जुनी असल्याचे सांगितले जात आहे. पुरातन इमारत जमिनीमध्ये आढळल्याने सर्वत्र आश्चर्य व्यक्त करण्यात आले. जुने शहरातील खोदकाम सुरू असलेल्या जागेपासून काही अंतरावर पुरातन असदगड किल्ला आहे. ती इमारत ऐतिहासिक महत्त्व असलेल्या किल्ल्याचाच भाग आहे का, असा प्रश्न देखील निर्माण झाला आहे.

इमारतीच्या पुरातन दगडांवर खूप वर्षांपूर्वी जय बजरंग बली, जय भोलेनाथ तसेच जय श्री राम लिहिलेलेसुद्धा आढळून आले. या भुयाराच्या आतमध्ये दोन छोट्या खोल्या बनल्या असून या भुयारात अंधार झाल्यानंतर कंदील लावण्याची सुविधादेखील करण्यात आल्याचे दिसून येते. इमारतीवर कोरीव काम केले आहे. ही भुयारासारखी दिसणारी इमारत नेमकी कशासाठी बांधली असावी, यासह अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

खोदकामादरम्यान आढळलेली इमारत पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली आहे. या इमारतीविषयी प्रचंड कुतूहल दिसून आले.

### अकोलेकरांचे श्रद्धास्थान

अकोला शहराचे आराध्य दैवत श्री राजराजेश्वर मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान आहे. मध्य भारतातील सर्वात मोठा प्राचीन कावड व पालखी महोत्सव शेवटच्या श्रावण सोमवारी श्री राजराजेश्वर मंदिरातच साजरा केला जातो. श्री राजराजेश्वराला जलाभिषेक करण्यासाठी कावड-पालखी सोहळ्याला ८० वर्षांची परंपरा आहे. १९४४ मध्ये अकोल्यात दुष्काळ पडला होता. त्यावेळी शिवभक्तांनी गांधीग्राम येथील पूर्णा नदीतील जल घेऊन राजराजेश्वराला अर्पण केले होते. त्यानंतर वरुणराजा चांगलाच बरसला व दुष्काळ मिटला. तेव्हापासून ही प्राचीन परंपरा अविरत सुरू आहे.

# From liquor bottles to seeking votes based on religion: Mumbai police crack down on poll code violations



● Mumbai - Ahead of the fifth phase of Lok Sabha elections 2024, the Mumbai police have booked several people for violating the Model Code of Conduct (MCC). Voting began in the six constituencies in Mumbai – North, North West, North East, North Central, South Central and South – on Monday morning.

The Kurar police detained a 53-year-old woman from the Kurar Appapada area of Malad East for carrying illicit liquor and seized four whiskey bottles from her.

An offence was registered against her, and she was allowed to leave after being served with a notice to join the police in their investigation at a later date. This action was taken after a team from the local flying squad of the Election Commission (EC) alerted the police.

The Sir J J Marg police registered a case in connection with an appeal for voting on the basis of religion at the entrance of Saboo Siddiqui Hospital in Dongri. The police identified the person who put up the poster on the hospital gate following which a notice to him to join the police probe at a later date.

In another case from the western suburbs, the D N Nagar police registered an FIR against a person for allegedly promoting a particular political party on Whatsapp groups even though the campaigning period was over. He was also issued a notice.

An officer said, "In several of these cases, it is the EC's flying squads that approach the local police after they spot some violations. We, too, have been carrying bandobast at various spots in the city to ensure there are no law and order issues."

# मुरूडमध्ये मत्स्यदुष्काळामुळे नौका किनारी

● मुरूड , प्रतिनिधी :



जागतिक तापमानामुळे समुद्री हवामानात सातत्याने होणारा बदल, वादळी वारा, समुद्रातील प्रदूषण, एलईडी मासेमारी आदी कारणांमुळे गेल्या काही वर्षांपासून माशांची संख्या कमी झाली आहे. यंदाच्याही हंगामात जाळयांमध्ये अपेक्षेपेक्षा कमी मासे जाळयात येत असल्याने मासेमारी बंदीचे आदेश येण्यापूर्वी अनेक मासेमारी नौका किनाऱ्यावर विसावल्या आहेत. या मत्सयदुष्काळामुळे मच्छीमारांना बोटीचे इंधन, जाळे आणि कामगारांचा पगार हा खर्च भागवताना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे.

मासेमारीचा अखेरचा हंगाम साधारण १ ते २५ मे असा असतो. यंदा मात्र या महिन्यातील दादली पद्धतीने मासेमारी करणाऱ्या कोळीबांधवांच्या दोन फेऱ्या खोल समुद्रात जाऊन देखील त्यांना रिकाम्या हाती परतावे लागत आहे. जाळयात छोटी कोळंबी मिळत असली तरी त्यातून डिझेलचा खर्चही सुटत नसल्याने अनेकांनी आपल्या होड्या किनाऱ्यावर आणून शाकारल्या असल्याची माहिती सागर कन्या मच्छीमार सोसायटीचे अध्यक्ष मनोहर बैले यांनी दिली.

सध्या वाढते तापमान, जलप्रदूषणामुळे मत्स्य प्रजननावर परिणाम होत आहे. तसेच एलईडी आणि पर्सिसनेट मासेमारीमुळे लहान मासे आणि माशांची पिल्ले पकडले जात आहेत. यामुळे समुद्रातील मासळीचे प्रमाण घटत चालले असल्याची तक्रार कोळी बांधव करीत आहे. त्यामुळे इंधन, बर्फ, खलाशींचा पगार आदींचा विचार करता जाळयातून मासळीतून मिळणारा परतावा अत्यंत कमी आहे. मत्सदुष्काळामुळे मत्स्य विभागाकडून मासेमारी बंदीचे आदेश येण्यापूर्वीच एकदरा आणि मुरुड येथील शेकडो मच्छीमारांनी मासेमारीला न जाण्याचा निर्णय घेतला आहे. परिणामी अनेक नौका किनाऱ्यावर विसावल्या आहेत.

**■ मुरुडमधील अनेक मच्छीमारांना एलडी मासेमारीमुळे मत्स दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे. छोट्या होड्यांतून किनाऱ्यालगत होणारी मासेमारीला फटका बसला आहे. तसेच मुरूड परिसरात मासे साठवणूक करण्यासाठी कोणतीही सोय उपलब्ध नसल्याने मोठ्या होड्यांना मासे विक्रीसाठी मुंबई गाठावे लागते. राज्य मत्स्य विभागाने या सोयी-सुविधांकडे लक्ष देण्याची गरज आहे.**

**- विजय गिदी, अध्यक्ष, राज्य मच्छीमार संघ**

# ११ वी, १२ वीच्या परीक्षा पद्धतीत मोठा बदल!

## प्रश्न व गुणांची टक्केवारी कशी बदलणार? CBSE समोर आव्हान काय?

● नवी दिल्ली, प्रतिनिधी :



केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (CBSE) इयत्ता ११ वी व १२ वी च्या परीक्षेच्या पद्धतीमध्ये काही महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. CBSE परीक्षा पॅटर्नचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सर्वांगीण विकास आणि सर्जनशील विचारांना प्रोत्साहन देणे असं आहे. येत्या काळात हे नवे बदल परीक्षेत अवलंबले जातील. हे बदल नेमके काय आहेत व त्याचा नेमका कसा फायदा होऊ शकतो हे आज आपण जाणून घेणार आहोत. मानव रचना शैक्षणिक संस्थांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व प्राध्यापिका गौरी भसीन यांनी इंडियन एक्सस्प्रेससाठी लिहिलेल्या लेखात याविषयी तपशीलवार माहिती दिली आहे.

सीबीएसई परीक्षेत काय बदलणार?

एक महत्त्वाचा बदल म्हणजे बोर्ड परीक्षेच्या निकालाची टक्केवारी १०० वरून कमी करून ८० अशी करण्यात आली आहे. २० टक्के महत्त्व हे प्रकल्प, तोंडी परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा अशा पद्धतीने विभागले जातील. असा बदल करण्याचे मुख्य कारण म्हणजे फक्त पुस्तकी ज्ञान देण्यापेक्षा, शिकलेल्या गोष्टींचा उपयोग कसा करावा याचे प्रशिक्षण देण्यावर भर दिला जावा असा बोर्डाचा हेतू आहे. २१ व्या शतकातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी प्रत्येक विद्यार्थी सज्ज असेल याचा बंदोबस्त करण्याच्या हेतूने या निर्णयाची अंमलबाजवणी करण्यात येणार आहे.

बहुपर्यायी प्रश्न (MCQ), केस-स्टडी आणि स्रोत-आधारित प्रश्नांच्या स्वरूपातील प्रश्न हे ५० टक्के गुण देणारे असतील. तर थोडक्यात आणि दीर्घ दोन्ही उत्तरांचा समावेश असलेल्या प्रश्नांची टक्केवारी ३० टक्क्यांपर्यंत असेल.

## सैतानी श्वास', असं औषध ज्याचा वास घेताच पैसे; दागिने सगळं देऊन टाकतात लोक



● मुंबई, प्रतिनिधी :

तुम्ही चोरीच्या अनेक घटना आजवर ऐकल्या असतील. काही ठिकाणी घरात कोणीच नसल्याचा फायदा उठवला जातो, तर काही ठिकाणी धमकावून चोरी केली जाते. पण आता अशा घटना उघडकीस येत आहेत, ज्यामध्ये धमकी न देता, कोणतीही जबरदस्ती न करता व्यक्ती आपल्या जवळचे दागिने, पैसे अथवा मौल्यवान वस्तू चोरांना नेऊन देते. तुम्हाला यावर विश्वास बसत नसेल, पण हे खरं आहे.

बांगलादेशात चोरट्यांनी नवीन पद्धत वापरून लोकांना लुटणं सुरू केलं आहे. यात ते एखाद्या व्यक्तीकडे पत्ता विचारण्यासाठी किंवा इतर कारणाने जातात आणि त्यांच्याकडील सर्व दागिने आणि पैसे लांबवतात. विशेष म्हणजे ती व्यक्तीही आपल्या घरातलं मौल्यवान सामान स्वतः चोरट्यांना देते.

# पलंग, पिशव्या अन् चपलांच्या बॉक्समध्येही ऐवज!

## IT च्या धाडीत सापडलं कोट्यवधींचं घबाड, अधिकारी रात्रभर पैसेच मोजत बसले !

● नवी दिल्ली , प्रतिनिधी :

प्राप्तिकर विभागाच्या धाडीत कोट्यवधी रुपये जप्त केले जातात. करचुकवेगिरी केलेल्यांकडे अनेकदा पैशांचं मोठं घबाड सापडतं. तर काहींकडे कोट्यवधींचे दागिने बेहिशेबी सापडतात. ही बेहिशेबी मालमत्ता मोजताना अनेक अधिकाऱ्यांची दमछाक होते. अशावेळी पैसे मोजायची मशिनही कमी पडतात. आता चक्क शूट ट्रेडर्स म्हणजे चप्पल व्यापारांच्या दुकानांवर प्राप्तिकर विभागाने धाड टाकली आहे.

दिल्लीत प्राप्तिकर विभागाने शनिवारी (१८ मे) मोठी धाड टाकली. १४ ठिकाणी झालेल्या छापेमारीत जवळपास १०० कोटींची गेख



रक्कम आणि दागिने जप्त करण्यात आले आहेत. सीएनबीसी टीव्ही १८ ने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. पलंग, कपाट, पिशव्या आणि चपलांच्या बॉक्समध्ये ही गेख रक्कम आणि सोन्या-चांदीचे दागिने सापडले.

आग्रा, लखनौ, कानपूर आणि नोएडा येथील अधिकारी, कर्मचारी, बँक कर्मचारी आणि पोलिसांसह प्राप्तिकर पथकाने शनिवारी सकाळी ११ वाजता एमजी रोडचे बीके शूज, धाकरनचे मनशु फूटवेअर आणि हिंग मंडीच्या हरमिलाप ट्रेडर्सच्या ठिकाणी छापे मारले. प्राप्तिकर विभागाने सोन्या-चांदीचे दागिने आणि कोट्यवधी रुपयांच्या जमिनीच्या गुंतवणुकीची कागदपत्रेही जप्त केली आहेत. तसंच, फक्त दुकानातच नव्हेतर मालकांच्या घरांवरही छापे टाकण्यात आले. जवळपास ४२ तासांहून अधिक काळ ही छापेमारी सुरू होती.

## कोल्हापुरात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस, कारवर झाड कोसळून दोघे जखमी



● कोल्हापूर, प्रतिनिधी:

शहर परिसरात सोमवारी दुपारच्या सुमारास वादळी वाऱ्यासह वळीव पावसाने जोरदार हजेरी लावली. दरम्यान, जोतिबा रोडवर कारवर भलेमोठे झाड कोसळले. या दुर्घटनेत दोघे जखमी झाले. जखमींना शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. गेल्या आठवडाभर जिल्ह्यात वळीव पाऊस कमी-अधिक प्रमाणात होत आहे. आगामी दोन दिवस जिल्ह्यात पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला होता. सकाळपासूनच वातावरणात उष्मा असल्याने घामाच्या धारा वाहत होत्या. दरम्यान, दुपारी पावसाने वादळी वाऱ्यासह अनेक ठिकाणी हजेरी लावली. वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी रस्त्यावर झाडे कोसळल्याच्या घटना घडल्या. तर घरांवरील पत्रे उडाली.

## विहीर, बोअरवेलचे पाणी संपले आदीवासी बांधवांना स्वखर्चाने घ्यावे लागते विकतचे पाणी




● तळा, प्रतिनिधी :

तळा तालुक्यातील खोंडकोल आदिवासी वाडीतील २५ ते ३० घरांना पाणी पुरवठा करणारे विहीर, बोअरवेलचे पाणी आटल्याने या समाज बांधवांना स्वखर्चाने विकतचे पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. रोवळा ग्रामपंचायत हद्दीत असणारी ही आदीवासी समाजाची घरे पाण्याविना कशी बरे जगणार मग अशा बाबतीत शासन म्हणून स्थानिक स्वराज्य संस्था, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी हे काय बघ्यांची भुमिका घेतली आहेत हाच खरा प्रश्न आहे. देशाच्या हर घर नळ ही संकल्पना आदीवासी बांधवांना मिळाली की नाही की मिळणार आहे ही नाही हाच खरा प्रश्न आहे.

■ आमच्या खोंडकोल आदिवासी समाजातील लोक पाणी नसल्याने स्वतःहून टॅंकर मागवत आहेत. ही फार मोठी शोंकातिका आहे. २५ ते ३० घरांनी कराव काय पाऊस अजून लांब आहे.

**गणेश पवार, ग्रामस्थ सदस्य. खोंडकोल आदिवासी वाडी.**

## बीड आणि बारामतीत बोगस मतदान, शरद पवारांचा सर्वात मोठा आरोप, कारवाईची मागणी



● बीड, प्रतिनिधी :

राज्यात लोकसभा निवडणुकीचे (Lok Sabha Election) चार टप्प्यातील मतदान पार पडले आहे. आज पाचव्या टप्प्यांचे मतदान पार पडत आहे. या वेळी पैसे वाटल्याचे आणि मतदारांवर दबाव आणण्यात आल्याच्या अनेक घटना समोर आल्या होत्या. बीड (Beed Election) आणि बारामतीतील (Baramati Election) मतदानात पैशांचा गैरवापर आणि काही व्यक्तीकडून नागरिकांवर दबाव झाल्याचा आरोप रोहित पवारांनी केला होता. यामळे राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. आता राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवारांनी बीड आणि बारामतीत बोगस मतदान झाल्याचा आरोप केला आहे. तसेच या संदर्भात निवडणूक आयोगाकडे कडक कारवाई करण्याची मागणी देखील त्यांनी या वेळी केली आहे. ते एबीपी माझाला दिलेल्या विशेष मुलाखतीत ते बोलत होते. शरद पवार म्हणाले, बीड, पुणे, बारामती लोकसभा मतदारसंघ सोडले तर बाकी ठिकाणी मतदान शांततेत पार पडलं.



**राज्याचे मुख्यमंत्री मा. एक्नाथ शिंदे यांनी किसननगर येथील 255 मतदान केंद्रावर कुटुंबियांसमवेत बजावला मतदानाचा हक्क. यावेळी वडील संभाजी शिंदे, पत्नी लता शिंदे, मुलगा व कल्याण लोकसभेचे उमेदवार श्रीकांत शिंदे उपस्थित होते.**

## अहमदाबाद विमानतळावर इस्लामिक स्टेटचे ४ दहशतवादी पकडले, श्रीलंकेचे कनेक्शन उघड



● नवी दिल्ली, प्रतिनिधी :

गुजरातमधील अहमदाबादमध्ये इस्लामिक स्टेटच्या ४ दहशतवाद्यांना पकडण्यात आले आहे. गुजरात एटीएसने चारही दहशतवाद्यांना अहमदाबाद विमानतळावरून अटक केली आहे. या दहशतवाद्यांची ओळख अद्याप समोर आलेली नाही. मात्र, हे चारही दहशतवादी इस्लामिक स्टेटशी संबंधित असून त्यांचे श्रीलंकन कनेक्शनही समोर आल्याचे सांगण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हे चार दहशतवादी अहमदाबादमध्ये येत असल्याची माहिती मिळाली होती. केंद्रीय एजन्सीने हे इनपुट गुजरात एटीएसला शेअर केले होते की इस्लामिक स्टेटशी संबंधित हे दहशतवादी विमानतळावर आले होते. हे सर्व दहशतवादी श्रीलंकेतील असल्याचे सांगण्यात येत आहे. सध्या गुजरात एटीएसने चारही दहशतवाद्यांची चौकशी सुरू केली आहे. अहमदाबाद विमानतळावर दहशतवादी कोणत्या उद्देशाने आले होते, याची माहिती मिळालेली नाही. त्यांच्याकडून मिळालेल्या तिकिटांच्या आधारे ते चेन्नईहून आल्याचे सांगण्यात येत आहे . इस्लामिक स्टेटचे हे दहशतवादी कोलंबोहून तामिळनाडूत आणि तामिळनाडूतून अहमदाबादमध्ये आले आहेत.

# अवकाळी पावसातच औद्योगिक क्षेत्रातील गटारे झाली काळी निळी

## कारवाई करण्यात प्रदूषण मंडळाचा हलगर्जीपणा



● महाड, प्रतिनिधी :

मागील चार दिवसापासून पडणाऱ्या अवकाळी पावसामुळे एकीकडे शेतकरी आणि नागरिकांचे पुरते हाल होत असतानाच औद्योगिक क्षेत्रात मधील कारखान्यांचा अनागोंदी कारभार चव्हाट्यावर आला आहे. अवकाळी पावसाचा फायदा घेत कंपनी व्यवस्थापन आणि कंपनीमधील केमिकल युक्त पाणी औद्योगिक क्षेत्रातील गटारामध्ये सोडल्याने गटारे काळया निळया रंगाच्या पाण्याने तुंबली आहेत.

यापूर्वी ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या पाण्याबाबत तक्रारी झाल्या होत्या त्याठिकाणी असलेल्या कारखान्यांवर कारवाई झाली नसल्याने त्यांचे चांगलेच फावले आहे. महाड औद्योगिक क्षेत्रातील लघु आणि रासायनिक कंपन्यांशी संबंधित व्यवसाय करणाऱ्या कंपन्यांकडून दरवर्षी सांडपाणी नदीत अथवा शेजारील नाल्यात सोडण्याचे प्रकार गेली अनेक वर्ष सुरू आहेत. या कारखान्यांवर राजकीय वरद हस्त असल्याने प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांचे देखील हात कारवाईसाठी पुढे होत नाहीत. कांहीं महिन्यांपूर्वी टायटन कंपनी च्या शेजारील नाल्यात टायटन कंपनीच्या समोरील कंपन्यांतील रासायनिक सांडपाणी प्रक्रिया न करताच गटारात सोडले गेले होते. यावेळी तक्रारी झाल्या मात्र सदर सांडपाणी प्रकरणी कारवाई झाली नाही. यामुळे याच ठिकाणी आता देखील रासायनिक सांडपाणी रस्त्यालगत असलेल्या गटारातून थेट जिते टेमघर नाल्यामध्ये गेले आहे. यामुळे जिते गावाच्या शेजारून वाहणारा नाला पूर्णपणे प्रदूषित झाला आहे.

अशीच परिस्थिती महाड औद्योगिक वसाहतीमध्ये अनेक ठिकाणी दिसून येत आहे त्या औद्योगिक क्षेत्रातील सुदर्शन कंपनी पासून थेट आवश्यक गावापर्यंत पसरलेल्या नदी नाल्यांमध्ये सध्या अवकाळी पावसानंतर वाहणाऱ्या पाण्यातून रासायनिक सांडपाणी नदीच्या पाण्यात जाऊन मिसळत आहे. महाड औद्योगिक क्षेत्राला प्रदूषणाचा वारसा आहे. मध्यंतरीच्या काळामध्ये हा प्रदूषणाचा शिक्का दूर करण्यासाठी महाड उत्पादक संघटनेने प्रयत्न केले होते या प्रयत्नांना काही अंशी यश मिळाले असले तरी औद्योगिक क्षेत्रातील अनेक लघु कंपन्या, रासायनिक क्षेत्राशी संबंधित लघु व्यवसायिक यांच्याकडून जाणीवपूर्वक रासायनिक सांडपाणी नाल्यात सोडण्याचा प्रकार केला जातो.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांचे याकडे . जाणीवपूर्वक दुर्लक्ष झाले आहे. त्यातच महाड औद्योगिक वसाहतीमध्ये राजकीय हस्तक्षेप वाढल्यामुळे आणि या लघु कंपन्या, व्यवसायिक यांना राजकीय पाठबळ मिळत असल्याने प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी देखील कारवाई करत नाहीत.

■ महाड औद्योगिक क्षेत्रातील बहुतांश कारखाने हे रासायनिक प्रक्रिया करणारे आहेत. या उत्पादनातून त्यांना करोडो रुपयांचा फायदा होतो. असे असले तरी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे पालन करण्यासाठी उपाय योजना करण्यास हे उद्योजक आपला हात आखडता घेतात. प्रत्येक कंपनीने आपल्या परिसरातच रासायनिक सांडपाणी प्रक्रिया काटेकरपणे केल्यास गटारे आणि नाल्यामध्ये सांडपाणी येण्याचा प्रश्नच उद्भवणार नाही मात्र या उपायोजना करताना लागणारा खर्च करण्यास या कंपन्यांकडून हात आखडता घेतला जात आहे. एम.आय. डी.सी. परिसरात सी एस आर च्या माध्यमातून आपण सामाजिक काम करत आहोत असे भासवून दुसरीकडे मात्र सांडपाणी सोडून प्रदूषण करत आहेत.

■ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे महाड मधील उपविभागीय अधिकारी कार्यालय हे फक्त नावापुरतेच असून या ठिकाणाहून केवळ नोटीस बजावण्याचे काम केले जात आहे. प्रदूषण रोखण्यास या कार्यालयाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. यामुळे कंपन्यांचे चांगलेच फावले आहे.

■ एकंदरीतच महाड औद्योगिक वसाहतीमध्ये राजकीय हस्तक्षेप वाढल्याने मोठ्या प्रमाणावर नाल्यांमध्ये रासायनिक सांडपाणी सोडून प्रदूषण झाले असताना देखील प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे अधिकारी डोळयावर काळी पट्टी बांधून केवळ वातानुकूलित ऑफिसमध्ये बसून कागदोपत्री घोडे नाचवण्याचे काम करीत आहे.